

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




ई मासिक **विद्यासंवाद**

नोव्हेंबर २०२४ | आवृत्ती–१७

# विद्यार्थ्यांनी गाजविला इंद्रधनुष्य महोत्सव



विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन–जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
१०० शताब्दी वर्ष
१९२३ - २०२३

नोव्हेंबर २०२४ | आवृत्ती–१७

मार्गदर्शक
डॉ. प्रशान्त बोकारे
प्रभारी कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

डॉ. राजेंद्र काकडे
प्रभारी प्र–कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
डॉ. राजू हिवसे
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
श्री. प्रेमदास वाडकर
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
श्री. प्रवीण गोतमारे
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. सी. पी. राधाकृष्णन**



मा. प्रभारी कुलगुरु
**डॉ. प्रशान्त बोकारे**



मा. प्रभारी प्र–कुलगुरु
**डॉ. राजेंद्र काकडे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**



विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन–जय करावया।।





# पुरस्काराचा विद्यार्थ्यांच्या संपूर्ण जीवनावर पडतो प्रभाव

## प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांचे प्रतिपादन

## 'इंद्रधनुष्य' सांस्कृतिक महोत्सवात पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव

कोणत्याही स्पर्धेमध्ये मिळालेला पुरस्कार विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील ठेवा असून संपूर्ण जीवनावर प्रभाव टाकत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी केले. महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवा महोत्सव 'इंद्रधनुष्य' ७ ते ११ नोव्हेंबर २०२४ दरम्यान अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात पार पडला. इंद्रधनुष्य महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी करीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या चमूने तब्बल ८ पुरस्कार पटकाविले. पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव सोमवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या एका कार्यक्रमात करण्यात आला. यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. बोकारे मार्गदर्शन करीत होते.

जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ, आयआयएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत, इंक्युबेशन संचालक डॉ. अभय देशमुख यांची उपस्थिती होती. मागील वर्षीच्या तुलनेत महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ युवक महोत्सवात जास्त पुरस्कार मिळाल्याने चमूचे अभिनंदन करीत पुढील वर्षी दुप्पट पुरस्कार कसे मिळवता येतील याचे नियोजन करण्याचे आवाहन प्रभारी कुलगुरू डॉ. बोकारे यांनी पुढे बोलताना केले. अन्य विद्यापीठ प्रत्येक कला प्रकारात अधिकाधिक विद्यार्थी कसे सहभागी होतील, याकडे जाणीवपूर्वक लक्ष देतात. त्यामुळे त्यांना अधिक पुरस्कार मिळत असल्याकडे लक्ष वेधत आगामी काळात त्यांच्यापेक्षा चांगले नियोजन करण्याच्या सूचना कुलगुरूंनी यावेळी दिल्या. युवा महोत्सवात विद्यापीठ चमूची वेगळी छाप पडावी म्हणून अत्याधुनिक साहित्य तसेच त्यांच्या साथीदारांसह स्पर्धेत उतरले पाहिजे. याबाबत सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी सांस्कृतिक चमूसह विद्यार्थी विकास विभागाला दिल्या. पुढील स्पर्धेत विद्यापीठाला अजिंक्यपद ट्रॉफी मिळावी यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करीत विद्यापीठाला बहुमान मिळवून दिल्याने विद्यार्थ्यांचे आभार मानले. इंद्रधनुष्य महोत्सवात राज्यपाल नामित निरीक्षक म्हणून उत्कृष्ट कार्य करीत विद्यापीठ चमूला पाठबळ प्राप्त करून दिल्याने कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांचे देखील कुलगुरूंनी अभिनंदन केले.

प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे यांनी पुरस्कार प्राप्त कलावंतांचे अभिनंदन करीत प्रतिनिधित्व तसेच नियोजन करण्यात कमी पडत असल्याचे सांगितले. आगामी युवा महोत्सवात जास्तीत जास्त प्रतिनिधित्व देत उत्कृष्ट कलेचे सादरीकरण करीत अधिकाधिक पुरस्कार प्राप्त करण्यासाठी चांगली तयारी करण्याचे आवाहन केले. यावेळी राज्यपाल नामित महोत्सवाचे निरीक्षक तथा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मनोगत व्यक्त करताना तेथील अनुभव विशद केले. विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट सादरीकरणाचे कौतुक करीत त्यांच्या अभिनंदनचा सोहळा आयोजित करण्याबाबत माननीय कुलगुरूंनी सुचित केल्याचे सांगितले. विविध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांचे परीक्षण होत निकाल कशाप्रकारे येत होते, तसेच तेथील प्रत्येक आयोजन आणि नियोजनाबाबत माहिती डॉ. हिवसे यांनी यावेळी दिली. युवा महोत्सवातील पुरस्कारांमध्ये वाढ व्हावी म्हणून ललित कला विभागाची मदत घेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना येथे एक महिना प्रशिक्षण देण्याबाबत त्यांनी माहिती दिली. एक विद्यार्थी विविध कला प्रकारात कशाप्रकारे सहभागी होईल याबाबत सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी विद्यार्थी विकास विभागाला दिल्या. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी केले तर आभार सांस्कृतिक समन्वयक श्री प्रकाश शुक्ला यांनी मानले.

## पुरस्कार प्राप्त चमू

अकोला येथील इंद्रधनुष्य युवा महोत्सवात विद्यापीठ संघाने साहित्यिक प्रकारात सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले. अनुष्का नाग, निर्मित लंगडे व प्रथमेश लांजेवार यांचा समावेश असलेल्या संघाने प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम पुरस्कार पटकावला. मेहंदी खातून शेख व विशाल राजकुमार खर्चवाल यांचा समावेश असलेल्या संघाने वादविवाद स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. मेहंदी खातून शेख विद्यार्थिनीने वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला. भारतीय शास्त्रीय नृत्य प्रकारात कल्याणी चिकुलवार या विद्यार्थिनीने प्रथम पुरस्कार पटकाविला. भारतीय समूह गान स्पर्धेत संघाने द्वितीय पुरस्कार पटकावला. या संघामध्ये इंद्राणी इंदुरकर, राधा ठेंगडी, तेजस्विनी खोडतकर, आयुषी देशमुख, निधी इंगोले, निधी रानडे, सुयोग देवळकर, चेतन नागोसे यांचा समावेश होता. स्किट (प्रहसन) प्रकारात संघाने तृतीय क्रमांक पटकावला. यात मोहित सरकार, शिफा अन्सारी, इंद्राणी इंदुरकर, चिराग शुक्ला, तान्या पंडित, शशांक रहांगडाले, युगलहंस मकराम यांचा समावेश होता. स्थळचित्रण प्रकारात प्रणय नैताम याने तृतीय क्रमांक, स्थळ चित्र प्रकारात यश वानखेडे याने द्वितीय क्रमांक पटकाविला. थिएटर प्रकारात लेखक म्हणून जय गाला तर दिग्दर्शक म्हणून सारंग गुप्ता यांनी जबाबदारी पार पाडली. साहित्यिक प्रकारात प्रशिक्षकाची जबाबदारी ॲड. दिपाली टेकाम यांनी तर संघ व्यवस्थापक म्हणून सारंग गुप्ता व डॉ. मंजू दुबे आणि सांस्कृतिक समन्वयक म्हणून श्री प्रकाश शुक्ला यांनी चोख भूमिका बजावली.



## नाविन्यपूर्ण

### सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स' ठरणार सौर ऊर्जेला पर्याय

**डॉ. स्मिता आचार्य यांचे संशोधन**

**वातावरणातील घातक वायूंचा होणार वापर**

सौर ऊर्जा जागतिक स्तरावर एक अत्यंत लोकप्रिय नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत म्हणून वाढत आहे. मात्र, काही वर्षे त्याचा वापर झाल्यावर खराब झालेले सौर पॅनल, बॅटरी या कचऱ्याची विल्हेवाट लावणे मोठी समस्या ठरणार आहे. या समस्येवर उपाय म्हणून आणि सौर ऊर्जेला पर्याय म्हणून 'सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स' प्रभावी ठरणार आहे. याबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्रो. डॉ. स्मिता आचार्य यांनी संशोधन करून पेटंट मिळविले आहे.

पर्यावरण पुरक ऊर्जा म्हणून सौर ऊर्जेकडे बघण्यात येते. त्यासाठी लावण्यात येणारी बॅटरी ही नेहमीच चार्जिंग होते. त्यातील सौर पॅनल आणि बॅटरी कालबाह्य होते. तेव्हा पॅनल आणि लिथियमची बॅटरी डिस्पोज करणे ही मोठी समस्या होते. त्याचा पुनर्वापर होत नाही. त्यामुळे भविष्यात त्यापासून तयार होणारा कचरा हे मोठे आव्हान ठरणार आहे. या समस्येचा अभ्यास करताना, डॉ. स्मिता आचार्य यांनी 'सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स' तयार करण्यासाठी एका 'सेमी कन्डक्टर'चा वापर करण्यात आलेला आहे. हे 'सेमी कन्डक्टर' कार्बनडाय ऑक्साईड आणि इतर ग्रीन हाऊस गॅसेसचाही वापर उर्जेत रुपांतर करण्यास मदत करते. विशेष म्हणजे, 'सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स'मध्ये प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करता येणे शक्य आहे. शिवाय त्यातून निघणारे पाणी हे सुद्धा हानिकारक नसल्याचे त्यांनी संशोधनातून सिद्ध केले आहे. सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स हे हायड्रोजन, नैसर्गिक गॅस किंवा बायोगॅस सारख्या इंधनांमधून रासायनिक ऊर्जा थेट विजेत रुपांतरित करतात. ते इलेक्ट्रो केमिकल प्रतिक्रियाद्वारे कार्य करते. या तंत्रज्ञानाद्वारे सातत्याने चोविस तास वीजपुरवठा मिळवणे शक्य होते. विशिष्ट हवामानाच्या परिस्थितीतही त्यांच्यावर परिणाम होत नाही. यामुळे हे एक अधिक विश्वासार्ह आणि किफायतशीर ऊर्जा उत्पादनाचे उपाय बनते. त्यामुळेच त्यांच्या या संशोधनाला पेटंटही मिळाले आहे.

## पर्यावरण पुरक स्त्रोत

सौर ऊर्जेला पर्याय म्हणून 'सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स' उपयुक्त आणि पर्यावरण पुरक स्त्रोत आहे. त्याचा वापर भविष्यात अतिशय महत्वपूर्ण ठरणार आहे. - डॉ. स्मिता आचार्य, प्राध्यापक, भौतिकशास्त्र विभाग

### अशी आहेत कारणे

'सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स' हे उत्पादन आणि स्थापना करण्यासाठी कमी खर्चीक आहे. त्यामानाने सोलर पॅनेल्स आणि त्यांच्याशी संबंधित इन्फ्रास्ट्रक्चर (जसे की स्टोरेजसाठी बॅटरी) च्या तुलनेत. त्याच्या सर्वच भागांमध्ये जैविकदृष्ट्या नष्ट होणारी आणि पुनर्वापर करण्यायोग्य खनिजांचा वापर केला जातो.

'सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स' चे उच्च रूपांतरण कार्यक्षमतेसह कमी इंधनातून अधिक ऊर्जा निर्माण करतात. ज्यामुळे दीर्घकालीन इंधन खर्च कमी होतो.

सोलर सेल्समध्ये ज्या प्रमाणात देखभाल आणि वेळोवेळी अपग्रेडेशनची आवश्यकता असते, मात्र, 'सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स' मध्ये कमी कार्यकारी आणि देखभाल खर्च असतो. त्यामुळे दीर्घकालीन बचत होते.

'सॉलिड ऑक्साइड फ्यूल सेल्स 'विविध इंधनांवर चालू शकतात, जसे की हायड्रोजन, बायोगॅस, आणि नैसर्गिक गॅस, जे सोर्ससाठी सोलर पॅनेल्सची सामग्रीपेक्षा अधिक सहज उपलब्ध आणि स्वस्त असतात.

सोलर ऊर्जा प्रणालीला मोठ्या प्रमाणावर सौर शेतांची स्थापना करण्यासाठी विस्तृत भू-भागाची आवश्यकता असते. या प्रकल्पासाठी



## डासांना पळवून लावतो एलईडीचा पिवळा प्रकाश

### एमएससी नॅनोसायन्स विद्यार्थ्यांचे डॉ. संजय ढोबळे यांच्या मार्गदर्शनात संशोधन



विविध आजारास कारणीभूत ठरणाऱ्या डासांना एलईडीचा पिवळा प्रकाश पळवून लावत असल्याचे समाजपयोगी महत्वपूर्ण संशोधन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील एमएससी नॅनोसायंसच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे यांच्या मार्गदर्शनात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील पेटंट प्राप्त झाले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे यांनी एमएससीच्या नॅनोसायंस व नॅनो टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत डासांना एलईडीच्या पिवळ्या प्रकाशामुळे दूर ठेवता येते, यावर उपयुक्त संशोधन करीत एका नवीन उपकरणाच्या आधारे शोधून काढले. यामध्ये नॅनोसायंस व टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी मुकेश तुरकाने, सिद्धेश्वर नागपुरे, प्रणाली झाडे व संशोधक विद्यार्थी डॉ. अभिजीत कदम यांच्या सोबत नॅनो टेक्नोमटेरियलवर आधारित एलईडीच्या प्रकाशित होणाऱ्या विभिन्न प्रकाशाच्या सहाय्याने यात लाल, निळा व पिवळ्या रंगाद्वारे असे शोधून काढले आहे की, डास हा पिवळ्या रंगापासून दूर राहतो. डॉ. संजय ढोबळे यांचे संशोधनाचे कार्य एलईडी व त्यांची उपयोगिता यावर आहे. त्यातूनच पिवळ्या रंगापासून डास दूर पळतात यावर त्यांनी शिक्कामोर्तब केले आहे. असे समाजाला उपयोगी असणारे संशोधन त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांच्या सहाय्याने जनतेसमोर ठेवले हे विशेष.

शहर असो की खेडे आज डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया आदी आजाराने सर्वांना त्रस्त केले आहे. डासांच्या संसर्गामुळे प्रत्येक परिवारात काही प्रमाणात त्याचे रुग्ण आढळतात. डासांपासून स्वतःचे रक्षण करण्याकरिता बाजारात वेगवेगळे प्रकारचे उपाय सांगितले जातात व त्यानुसार प्रत्येक व्यक्ती आपली सुरक्षा करतो हे देखील खरे आहे. आज वनस्पती पासून तर नवीन तंत्रज्ञानापर्यंत चा वापर करून देखील डासांपासून संरक्षण केले जाते यापूर्वी ओझोला या वनस्पती पासून डासाचे प्रजनन थांबविता येते याबाबत माहिती प्रत्येक व्यक्तीजवळ पोहोचवण्यास डॉ. ढोबळे यांनी प्रयत्न केले आहे.

घरामध्ये पिवळ्या रंगाचे विद्युत दिवे लावून त्यातून डासांना दूर ठेवता येईल असे त्यांनी सिद्ध केले आहे घराच्या मुख्य दारासमोर व खिडकी समोर, बगीच्यात पिवळ्या रंगाचे विद्युत दिवे किंवा भिंती पिवळ्या रंगानी पेंट केलेल्या असेल तर त्या ठिकाणी डास येणार नाही किंवा कमी येतील. घरातील व्यक्तींची डासांपासून सुरक्षा होऊन ते मलेरिया, डेंग्यू व चिकनगुनिया आदी आजारांपासून दूर राहील असे संशोधनातून म्हटले आहे.

डॉ. ढोबळे व त्यांच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या संशोधनाची समाजाला आज फार आवश्यकता आहे व ते नेहमीच समाजला उपयुक्त असणारे संशोधन करतात हे महत्त्वाचे आहेत. या संशोधनावर कार्य करीत डॉ. ढोबळे यांनी आंतरराष्ट्रीय पेटंट प्रस्तुत केले होते, ते त्यांचे पेटंट मान्य झाले आहे. एमएससी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय पेटंट मान्य झाल्याबद्दल डॉ. ढोबळे यांनी स्वतः आनंदी होत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढे त्यांनी संशोधनाचा मार्ग निवडावा तसेच देशाला वैज्ञानिक दृष्टिकोन द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. उत्तम व समाजपयोगी संशोधन केल्याबद्दल विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे










# विद्यापीठात 'न्यूरोएंडोक्रिनोलॉजी'वर कार्यशाळा
## औषधी निर्माणशास्त्र विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'न्यूरोएंडोक्रिनोलॉजी' या विषयावर १० ते १६ नोव्हेंबर २०२४ दरम्यान पॅन इंडियन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचा औषधी निर्माणशास्त्र विभाग, जर्नल ऑफ न्यूरोएंडोक्रिनोलॉजी' आणि ब्रिटिश सोसायटी ऑफ न्यूरोएंडोक्रिनोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा झाली.

कार्यशाळेचा उद्घाटनीय कार्यक्रम माननीय प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. प्रमुख अतिथी म्हणून कॅम्ब्रिज, युके येथील एमआरसी, लॅबोरेटरी ऑफ मॉलिक्युलर बायोलॉजीचे डॉ. मायकल हेस्टिंग्स, विशेष अतिथी म्हणून यूएसए मधील वेस्ट व्हर्जिनिया विद्यापीठाच्या फिजियोलॉजी, फार्माकोलॉजी आणि टॉक्सिकोलॉजी विभागातील प्रोफेसर डॉ. रॉबर्ट गुडमॅन, औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. दादासाहेब कोकरे यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. हेस्टिंग्स यांनी न्यूरोएंडोक्राइन संशोधनातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि आगामी संशोधनातील तफावत कमी करण्याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. गुडमॅन यांनी एंडोक्राइन सिस्टिमच्या न्यूरोबायोलॉजीबाबत त्यांना असलेल्या सखोल ज्ञानामुळे संपूर्ण माहिती दिली. सोबतच मेटाबोलिक आजारांवरील संशोधनाच्या वर्तमान परिस्थितीवर विचार व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषण करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ राजेंद्र काकडे यांनी विद्यार्थ्यांमधील संशोधन कौशल्यांच्या विकास आणि कार्य पूर्ण करण्यासाठी संसाधनांची निर्मिती कशी करावी यावर मार्गदर्शन केले. तसेच, न्यूरोॲनाटॉमी विषयी मांडणी केली. मेंदू आणि शरीर कसे एकमेकांसोबत समन्वय साधून आवश्यक शारीरिक क्रिया नियंत्रित करतात हे त्यांनी स्पष्ट केले.

औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक यांनी न्यूरोएंडोक्रिनोलॉजीच्या विषयावर प्रकाश टाकला आणि कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विभागाच्या प्रयत्नांचे कौतुक केले. संयोजक डॉ. दादासाहेब कोकरे यांनी विभागाच्या स्तरावर न्यूरोएंडोक्रिन संशोधनाच्या प्रगतीचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांसाठी आणि नवोदित संशोधकांसाठी त्याच्या उज्वल भविष्यासंदर्भात होत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

उद्घाटन कार्यक्रमातील बीजभाषण किंग जॉर्ज मेडिकल युनिव्हर्सिटी, लखनऊ येथील डॉ. विनोद कुमार यांनी केले. डॉ. विनोद कुमार यांनी न्यूरोएंडोक्राइन संशोधनाचा वारसा त्यांच्या भाषणात अधोरेखित केला. पक्ष्यांच्या स्थलांतरावरील न्यूरोएंडोक्राइन कार्यक्षमतेच्या प्रभावावर विस्तृतपणे चर्चा केली आणि पर्यावरणीय घटकांचे (तापमान, वेळ, उंची इत्यादी) परिणाम स्पष्ट केले. डॉ. रिता वडेतवार यांनी उद्घाटन सत्राचे संचालन केले तर डॉ. राजेश उगाले यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला माजी विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, आयआयएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत, टेक्नॉलॉजी आणि एनर्जी पार्कचे संचालक डॉ. प्रकाश इटनकर, डॉ. प्रमोद सालवे आणि डॉ. सतेन्द्र प्रसाद यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. भारत भरातील विविध विद्यापीठ आणि महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते.



# पदवीपूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरी
## ॲसेंचर कंपनीत सात विद्यार्थ्यांची निवड
### माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले विद्यार्थ्यांचे अभिनंदन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित 'प्लेसमेंट ड्राईव्ह'मध्ये पदवी मिळण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली आहे. ॲसेंचर या कंपनीत तब्बल ३.५ लाखांचे वार्षिक पॅकेज प्राप्त करीत विद्यापीठातील ७ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

जमनालाल बजाज भवन येथे शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित एका कार्यक्रमात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठ शैक्षणिक परिसरातील नम्रता नीरज त्रिपाठी, हिस्लॉप महाविद्यालयातील मनीषा ईश्वर महादुलकर, सेवादल महिला महाविद्यालयातील मंजिरी राहुल बावस्कर, आदिती रवींद्र गावंडे व उन्नती रामचंद्र खंते तर एसएफएस महाविद्यालयातील अभय राजू लोणकर व वंश सुजितकुमार मिश्रा या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे आगामी उन्हाळी २०२५ च्या परीक्षेत सर्व विद्यार्थी पदवी प्राप्त करणार आहे. यामध्ये एमएससी मधील एक तर अन्य विद्यार्थी पदवी अभ्यासक्रमात शिक्षण घेत आहेत. विद्यापीठातील महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील ग्रामगीता भवन येथे ॲसेंचर कंपनीच्या वतीने अर्ज प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांमधून १२६ जणांची ऑनलाइन परीक्षा १८ सप्टेंबर २०२४ रोजी घेण्यात आली. यामधून प्रत्यक्ष मुलाखतीनंतर सात विद्यार्थ्यांची निवड कंपनीच्या वतीने करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नागपूर मिहान येथे रुजू केले जाणार आहे. विशेष म्हणजे, निवड झालेले सर्वच विद्यार्थी बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातून शिक्षण घेतलेले आहेत. यावेळी पदव्युत्तर गणित विभाग प्रमुख डॉ. गणेश केदार, हिस्लॉप महाविद्यालयाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. हरिओम पुनियानी, सेवादल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निरुपमा ढोबळे, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. प्रभाकर भंडारी व एसएफएस महाविद्यालयाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. साधनकर यांची उपस्थिती होती. शिक्षण प्राप्त होताच विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त व्हावा म्हणून विद्यापीठाच्या वतीने रोजगार व प्रशिक्षण विभाग निर्माण करण्यात आला आहे. या विभागाच्या वतीने विविध कंपन्यांचे प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित केले जाते. या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त होत आहे.






## मानसोपचार तज्ज्ञांची समाजासाठी महत्त्वपूर्ण भूमिका

### प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांचे प्रतिपादन

### मानसिक आरोग्य जागरूकता कार्यक्रमास सुरुवात

मानसोपचार तज्ज्ञांची समाज विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी केले. पदव्युत्तर शैक्षणिक मानसशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'सुकून' मानसिक आरोग्य जागरूकता कार्यक्रमाचे उद्घाटन मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडले. महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील पी. व्ही. नरसिंहराव वाचनालयासमोरील बगीचात आयोजित कार्यक्रमात डॉ. काकडे बोलत होते.

उत्तम मानसिक आरोग्य लाभावे या दृष्टीने विभागाच्या वतीने सतत तिसऱ्या वर्षी देखील 'सुकून' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षसन माननीय प्रभारी कुलगुरू डॉ राजेंद्र काकडे यांनी भूषविले यावेळी मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिना खान, डॉ. सुबोध बनसोड, डॉ. धीरज कदम, वसंतराव नाईक शासकीय सामाजिक संस्था येथील मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शब्बीर पठाण यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. 'अराजकतेवर शांततेने मात' या थीमवर आयोजित सुकून कार्यक्रमाचे उद्घाटन करताना समाजातील सर्व घटकांच्या दृष्टीने मानसिक आरोग्य हा विषय अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे डॉ. काकडे म्हणाले. समाजाच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विभागाच्या वतीने हा चांगला उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये विद्यार्थी तसेच बालकांच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने कार्यक्रमांचा समावेश करावा, असे त्यांनी सांगितले. सोबतच एक उत्कृष्ट मानसोपचार तज्ज्ञ म्हणून स्वतःला अग्रेषित करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

उद्घाटन कार्यक्रमानंतर प्र-कुलगुरु डॉ. काकडे यांनी विद्यार्थ्यांकडून लावण्यात आलेल्या विविध स्टॉल्सची पाहणी केली. यावेळी पदभ्युत्तर मानसशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर आधारित नुक्कड नाटक सादर केले. विविध ८ प्रकारचे उपक्रम या कार्यक्रमात विद्यार्थ्यांकडून राबविण्यात आले. माहिती दर्शविणारे ३, मानसिक अवस्था तपासणी करणारे ३ तर मानसिक उपक्रमावर

आधारित ३ असे एकूण ८ स्टॉल यावेळी लावण्यात आले होते. यावेळी विभागातील शिक्षक डॉ. सीमा पागे, प्राजक्ता जोशी, अंजन माहेश्वरी, दिव्या काटोटे, नीलिमा रामटेके, सना शेख, आकाश शेवतकर, अभिजीत तितरमारे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात तिरपुडे ब्लड बँककडून रक्तदान शिबिर घेण्यात आले. सेवांकुर नागपूर यांच्याकडून दंत तपासणी त्याचप्रमाणे आरोग्य तपासणी करण्यात आली. लोककल्याण डायग्नोस्टिक सेंटरच्या वतीने रक्त तपासणी, थॅलेसेमिया व सिकलसेल तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाला चेरी फार्म, सुप्रीम सोल्युशन्स, व्यसनमुक्ती केंद्र व टेलीमानस यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मानसशास्त्र विभागातील स्टुडन्ट कौन्सिलने सहकार्य केले.





## कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य' वर चर्चासत्र
### मानसशास्त्र विभागाचे 'सुकून' अंतर्गत आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मानसशास्त्र विभागाच्या वतीने सुकून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत विभागातील सभागृहात 'कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य' तसेच मानसशास्त्रातील विविध विषयांवर बुधवार, दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे व प्रभारी प्र- कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. हिना खान यांनी भूषविले. 'बात करने से ही होगा' या थीमवर आयोजित चर्चासत्रात मानसोपचार तज्ञ डॉ. रवी ढवळे, मानसशास्त्रज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. रुबीना अन्सारी, मानसशास्त्रज्ञ डॉ. सुमेधा वानखडे, रतन टाटा महाराष्ट्र स्टेट स्किल्स मुंबई लँग्वेज अँड स्किल कोर्सेसचे प्रमुख श्री. पंकज तावडे यांनी कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सोबतच नोकरी शोधत असताना किंवा नोकरीच्या ठिकाणी येणारा ताण व कामाच्या ठिकाणी होणारा छळ अशा विविध आणि महत्त्वपूर्ण विषयांवर वक्त्यांनी प्रकाश टाकला. मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिना खान, डॉ. सुबोध बनसोड व अन्य शिक्षकांची यावेळी उपस्थिती होती. चर्चासत्रानंतर गायक खुशाल भोयर यांनी सुरेल गीत सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.






## गुरुग्राम येथे आदिवासी अभ्यासासह नाविन्यपूर्ण स्टार्टअपचे प्रदर्शन
### विकसित भारत विविभा कॉन्क्लेव्हमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा सहभाग

श्री गुरु गोविंदसिंग ट्रायसेन्टेनरी विद्यापीठ गुरुग्राम (एसजीटी) येथे आयोजित विकसित भारत विविभा २०२४ कॉन्क्लेव्हमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने आदिवासी अभ्यास तसेच इंक्युबेशन सेंटरच्या नाविन्यपूर्ण स्टार्टअपचे प्रदर्शन करण्यात आले. गुरुग्राम येथे १५ ते १७ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित कॉन्क्लेव्हमध्ये विद्यापीठाचे इंक्युबेशन सेंटर तसेच पदव्युत्तर इतिहास विभागाच्या वतीने स्टॉल्स लावण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमधील उद्योजक कलागुणांना वाव मिळावा म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने इन्क्यूबीन फाउंडेशन तयार करीत इंक्युबेशन सेंटर सुरू केले आहे. या इन्क्युबीन फाउंडेशनच्या मध्य भारतातील प्रसिद्ध आणि सुसज्ज अशा फॅबलॅबच्या माध्यमातून असंख्य विद्यार्थी नाविन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्ष साकारत आहे. विद्यार्थ्यांनी मूर्तरूप दिलेले नाविन्यपूर्ण प्रकल्प, यंत्र तसेच नाविन्यपूर्ण स्टार्टअपचा स्थानिक तसेच इतर क्षेत्रातील उद्योजकांना लाभ होत आहे. याच इंक्युबेशन सेंटर मधील नाविन्यपूर्ण स्टार्टअपचे प्रदर्शन गुरुग्राम येथील विकसित भारत विविभा २०२४ कॉन्क्लेव्हमध्ये करण्यात आले. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवसाच्या कार्यक्रमात इन्क्युबेशन केंद्रातील सदस्यांनी गुरुग्राम येथील कॉन्क्लेव्हमध्ये भेट देणारे विद्यार्थी, उद्योजक तसेच उदयोन्मुख स्टार्टअप यांना मौल्यवान मार्गदर्शन करीत अंतर्दृष्टी प्रदान केली. इन्क्यूबीन फाउंडेशनचे संचालक डॉ. अभय देशमुख, इन्क्युबीन सेंटरचे व्यवस्थापक श्री योगेश कुंते यांच्यासह विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

## ट्रायबल स्टडीजच्या स्टॉलने वेधले लक्ष







गुरुग्राम येथील कॉन्क्लेव्हमध्ये पदव्युत्तर इतिहास विभागाच्या वतीने पारंपारिक ज्ञान प्रणाली (TKS) आणि स्थानिक समुदाय व त्यांच्या सभोवतालचे संबंध या विषयाच्या अनुषंगाने केलेल्या पोस्टर पेपर प्रेझेंटेशनने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्या नेतृत्वात पोस्टर पेपर प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. पारंपारिक ज्ञान प्रणाली आणि स्थानिक भौगोलिक समुदाय : संबंध आणि वारसा या पोस्टर पेपर प्रेझेंटेशनच्या माध्यमातून दर्शविण्यात आला. निसर्गाशी घनिष्ठ संबंधासोबत विकसित झालेल्या नैसर्गिक संसाधनांविषयी संचित कौशल्य आणि ज्ञानाच्या पिढ्यांचे प्रतिनिधित्व कशाप्रकारे केल्या जाते हे या माध्यमातून दर्शविण्यात आले आहे. पारंपारिक ज्ञान प्रणालीमध्ये मौखिक इतिहास, जमीन व्यवस्थापन, कृषी तंत्र, औषधी ज्ञान आणि आध्यात्मिक विश्वास यासारख्या विविध पद्धतींचा समावेश असल्याची माहिती यातून देण्यात आली. पारंपरिक ज्ञान प्रणाली पर्यावरणीय संतुलन आणि सामाजिक-सांस्कृतिक संरक्षणास प्रोत्साहन देत असल्याचे दर्शविण्यात आले आहे. जीआयएस सारखी सहभागी पध्दती आणि साधनांद्वारे स्वदेशी भौगोलिक नकाशा तयार करून पारंपारिक प्रदेश, पवित्र स्थळे आणि संसाधन क्षेत्रे अधोरेखित करता येतात. यातून स्थानिक हक्कांचे संरक्षण सक्षम करता येईल आणि जैवविविधता संवर्धन करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे जागतिकीकरण, जमीन अधिकार समस्या आणि हवामान बदल यांसारख्या आव्हानांचा सामना करीत आधुनिक संवर्धन प्रयत्नांसह पारंपारिक ज्ञान प्रणाली एकत्रित शाश्वत विकासाचा मार्ग प्रशस्त करेल असे या पेपर पोस्टर प्रेझेंटेशनच्या माध्यमातून दर्शविण्यात आले. विविध शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे, विद्यार्थी आणि प्राध्यापकांसह विविध लोकांनी स्टॉलला भेट दिली.

## प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे यांचा सन्मान



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे यांचा पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणीची प्रतिमा देत मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी सन्मान करण्यात आला. पंढरपूर येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुनील गावडे तसेच श्री बालाजी पाटील यांनी कार्तिक एकादशीचे औचित्य साधून माननीय प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे यांचा पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणीची प्रतिमा देत सन्मान केला. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. वामनजी तुर्के, महाविद्यालयीन विकास विभागाचे उपकुलसचिव डॉ. रमन मदने यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# महापुरुषांचे जयंती महोत्सव



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पंडित जवाहरलाल नेहरू जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भावनातील सभागृहात गुरुवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ रोजी जयंती कार्यक्रम पार पडला. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकुलसचिव श्री संजय बाहेकर यांच्या शुभहस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात बिरसा मुंडा जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भगवान बिरसा मुंडा यांची जयंती शुक्रवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकुलसचिव श्री संजय बाहेकर यांच्या शुभहस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





## विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता दिवस

भारताच्या माजी प्रधानमंत्री स्व. इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता दिवस कार्यक्रम मंगळवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडला. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी भूषविले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय एकात्मता दिवसाच्या निमित्याने प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. कार्यक्रमाला सर्व विद्या शाखांचे अधिष्ठाता, विविध प्राधिकारणींचे सदस्य, सांविधिक अधिकारी, विभाग प्रमुख, शिक्षक यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.





## विद्यापीठात अवयवदान जनजागृती कार्यक्रम
### पदव्युत्तर तत्त्वज्ञान विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर तत्त्वज्ञान विभागात 'जीवनानंतरही जीवन द्या' अशा आशयाचा अवयवदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. मानव विज्ञान विद्याशाखा इमारतीतील सभागृहात बुधवार, दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमात या विषयावर विशेष व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमाचे आयोजन पदव्युत्तर तत्त्वज्ञान विभाग, पदव्युत्तर समाजशास्त्र आणि सामाजिक कार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

या कार्यक्रमात 'जीवनानंतरही जीवन द्या' या महत्त्वपूर्ण विषयावर अतिथी व्याख्यान घेण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश अवयवदानाचे महत्त्व आणि त्यामागील जीवन बदलवणाऱ्या संधींची जाणीव लोकांपर्यंत पोहोचवणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. धीरज कदम यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर, संचालन करणाऱ्या पायल यांनी मान्यवरांचे परिचय करून दिले. या व्याख्यानासाठी "मोहन फाउंडेशन" या अवयवदान क्षेत्रातील प्रसिद्ध संस्थेचे मान्यवर, प्रकल्प व्यवस्थापक सौ. वीणा वाठोरे आणि ब्रँड ॲम्बेसेडर श्री. देवांग छाया उपस्थित होते .

श्री. देवांग छाया यांनी अवयवदानाच्या महत्त्वावर जोर देत, लोकांना या जीवनदायी कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन कसे द्यावे, याविषयाच्या अनुषंगाने महत्वपूर्ण संवाद साधला. सौ. वीणा वाठोरे यांनी मोहन फाउंडेशनच्या कार्याचे तपशीलवार विवेचन केले आणि अवयवदान प्रक्रियेत व सहाय्य सेवांमध्ये संस्थेची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचा समारोप समाजशास्त्र आणि सामाजिक कार्य विभागाच्या प्रमुख डॉ. अपर्णा समुद्र यांच्या आभाराने झाला. त्यांनी मान्यवर वक्ते आणि उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन सबा कौसर यांनी केले. या व्याख्यानातून अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित होऊन, विद्यार्थ्यांना तसेच प्राध्यापकांना या जीवनदायी कृतीची जाणीव करून देण्यात आली. ज्यामुळे "जीवनानंतरही जीवन द्या" या विचाराला प्रोत्साहन मिळाले.





## भौतिकशास्त्र विभागात वरिष्ठ क्रायोजनिक्स अभियंता डॉ. श्रीकांत पट्टलवार हे ॲड्जंक्ट प्राध्यापक म्हणून नियुक्त

वॅरिंग्टन युके येथील ॲसिलेटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी सेंटर, युकेआरआय- एसटीएफसी देअर्स्बरी लॅबोरेटरी येथील वरिष्ठ क्रायोजनिक्स अभियंता डॉ. श्रीकांत पट्टलवार यांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागात ॲड्जंक्ट प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे युके येथील वरिष्ठ क्रायोजनिक्स अभियंता तथा प्रकल्प प्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या एका तज्ञ व्यक्तिमत्त्वाचे मार्गदर्शन भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे.

डॉ. श्रीकांत पट्टलवार हे त्यांच्या नव्या भूमिकेत आधुनिक भौतिकशास्त्र विषयातील अत्याधुनिक विषयांवर विद्यार्थ्यांचे वर्ग घेणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील प्रगतीसाठी नाविन्यपूर्ण तसेच सखोल ज्ञान मिळविण्याची संधी मिळणार आहे. भौतिक शास्त्रातील संघनित

पदार्थ प्रयोगात्मक तंत्रे आणि कमी तापमान भौतिक शास्त्रातील (संकल्पनात्मक) प्रयोग तयार करण्याची आणि सेटअप करण्याची तंत्रे या विषयावर संवाद साधत असताना डॉ. पट्टलवार यांनी भौतिक शास्त्रातील अत्यंत जटिल प्रयोग सोप्या पद्धतीने करणे शक्य असल्याचे सांगितले. भौतिक शास्त्रातील कठीण संकल्पनांना सोप्या आणि समजण्यास योग्य अशा पद्धतींमध्ये बदलण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. यातून संशोधक आणि विद्यार्थी दोन्हींसाठी प्रगतीपूरक प्रयोग अधिक सुलभ होतात, असे त्यांनी सांगितले. युकेमध्ये कौशल्यपूर्ण संशोधकांची मागणी वाढत असून पीएचडी शिकणाऱ्यांसाठी दिलासादायक माहिती त्यांनी दिली. युकेमध्ये पीएचडी प्रवेश तसेच जीआरई किंवा टीओईएफएलची आवश्यकता नाही. शिवाय, आकर्षक फेलोशिप मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आशावादी उमेदवारांसाठी एक मोठी संधी असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यकर्दीला पुढे नेण्यास मदत करू शकते, असे त्यांनी सांगितले.

शैक्षणिक क्षेत्रातील नवनवीन संशोधन तसेच माहितीच्या आदान-पधानास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ स्वागत करण्यास उत्साहित आहे. तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनामुळे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात महत्वपूर्ण बदल होत नवीन संधी निर्माण होईल, असे विभाग प्रमुख डॉ. ओ.पी. चिमणकर यांनी सांगितले. विभागप्रमुख डॉ. ओ. पी. चिमणकर यांनी डॉ. श्रीकांत पट्टलवार यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे, डॉ. राजू हिवसे यांनी डॉ. श्रीकांत पट्टलवार यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे समन्वयन आयक्युएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी केले. यावेळी डॉ. विलास सप्रे, डॉ. अच्युत देशपांडे, डॉ. सुभाष कोंडावार, डॉ. उमेश पलिकुंडवार यांच्यासह विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.




## गृहविज्ञान विभागात मतदार जनजागृती कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर गृह विज्ञान विभागात मतदार जनजागृती कार्यक्रम मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात आला. या कार्यक्रम अंतर्गत घोषणा लेखन तसेच सेल्फी काढण्याबाबत स्पर्धा घेण्यात आली.

महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २० नोव्हेंबर रोजी होऊ घातली आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार जनजागृती व्हावी म्हणून विद्यापीठाच्या पदव्युत्तर गृहविज्ञान विभागाच्या वतीने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी सेल्फी काढण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात गृह विज्ञान आणि पोषण तसेच संसाधन व्यवस्थापन या दोन्ही अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण व्हावी म्हणून घोषणा लेखन स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली. 'तुमचे मत तुमचा आवाज', 'प्रत्येक मत अमूल्य', 'मतदानाद्वारे तुमचा आवाज बुलंद करा' अशाप्रकारे विविध घोषणा लेखन स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. वंदना धवड यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रेरित केले. डॉ. तुलिका खरे यांनी या उपक्रमाचे उद्देश आणि महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमात डॉ. प्राजक्ता नांदे, डॉ. शुभदा जांभुळकर, श्रीमती मीना सुरपांडे, डॉ. नयना तायडे, नेहा सुकळीकर तसेच गैर कर्मचारी आणि विद्यार्थी सक्रियपणे सहभागी झाले होते.




## ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती क्रांतिकारी घटना

### माजी निवडणूक आयुक्त श्री जे. एस. सहारिया यांचे प्रतिपादन

### पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात अतिथी व्याख्यान

देशातील केंद्र व राज्य ही द्विस्तरीय राज्यव्यवस्था १९९२ मधील ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था अशी त्रिस्तरीय झाली. त्यामुळे ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती ही सामाजिक लोकशाही मधील क्रांतिकारक घटना होती, असे प्रतिपादन माजी निवडणूक आयुक्त श्री. जे. एस. सहारिया यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात 'महाराष्ट्रातील निवडणुकीचे राजकारण' या विषयावर शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ रोजी अतिथी व्याख्यान पार पडले. यावेळी सहारिया मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. व्याख्याते म्हणून माजी निवडणूक आयुक्त श्री. जे. एस. सहारिया, मुंबई विद्यापीठातील डॉ. मृदुल निळे, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली येथील प्रा. डॉ. हरीश वानखेडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना त्रिस्तरीय झालेली रचना 'पंचायत राज' नावाने प्रसिद्ध झाली असे सांगितले. या बदलामुळे लोकशाहीचे स्थानिक विकेंद्रीकरण करण्याचे तसेच महिला, दलित, आदिवासी, भटके विमुक्त या वंचित-उपेक्षित घटकांचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढवण्याचे महत्त्वाचे काम झाले. शासन व्यवस्थेतील पहिली सामाजिक क्रांती ही सार्वत्रिक प्रौढ मताधिकार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांतील निवडणूक प्रक्रियेबाबत अद्यापही अपेक्षित प्रमाणात विद्यापीठ आणि विविध संशोधन संस्थांमध्ये संशोधन होताना दिसून येत नाही, असे सहारिया म्हणाले. त्यामुळे सर्व सामान्य लोकांना त्या संदर्भात माहिती उपलब्ध होत नाही, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना राज्य निवडणूक प्रक्रिया, निवडणुकांवर होणारा खर्च, स्थानिक पातळीवर निवडणुकांचे व्यवस्थापन, स्थानिक पातळीवर कशा पद्धतीने केले जाते, यावर संशोधनात्मक अभ्यास करण्यास प्रवृत्त केले.

याप्रसंगी प्रमुख वक्ते मुंबई विद्यापीठातील प्रा. डॉ. मृदुल निळे यांनी " निवडणूक सर्वेक्षणाचे आयोजन: सूत्रबद्धता, अंमलबजावणी आणि विश्लेषण' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संशोधन पद्धती कशा अवलंबल्या पाहिजेत आणि निवडणुकीचा अभ्यास करीत असताना सर्व्हेची आखणी डेटा संकलन आणि त्यांचे विश्लेषण करण्याकरिता कोणकोणत्या पद्धती वापरायला हव्या. जेणेकरून निवडणूक संदर्भात अचूक आकलन आपल्याला करता येईल, याबाबत सविस्तर माहिती त्यांनी आपल्या व्याख्यानातून दिली. आयोगाने आणलेल्या पाच सुधारणांचे उदाहरण दिले. पक्षाची नोंदणी रद्द करणे, निवडणूक खर्चाचे प्रदर्शन, नोटा, प्रतिज्ञापत्र प्रणाली आणि तंत्रज्ञान, लोकशाही निर्देशांक - इकॉनॉमिक इंटेलिजेंस युनिटद्वारे स्वातंत्र्य, पारदर्शकता आणि मुक्त व निष्पक्ष निवडणूकांचे मूल्यमापन कसे करता येईल, असे सागितले. त्यातून निवडणुकांवर कसा प्रभाव पडेल, यावर प्रकाश टाकला. विशेष व्याख्यानाचे वक्ते जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली येथील प्रा. डॉ. हरीश वानखेडे यांनी 'महाराष्ट्रातील सत्ता राजकारणातील बदलती गतिशिलता' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना केले, निवडणुकांच्या संचलनात संकल्पना मान्य महत्त्वाच्या निर्णयाक आहे. राजकीय प्रक्रियेचे परीक्षण करण्यासाठी सत्ता हे एक विश्लेषणात्मक तंत्र आहे ज्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सत्ता स्थित्यंतरे व त्यामागील कारणे समजून घेता येईल, यांची विश्लेषणात्मक मांडणी डॉ. वानखेडे यांनी केली.

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये इतर घटकांपैकी मराठ्यांचे प्रभुत्व आणि त्यामधील झालेल्या स्थित्यंतर महाराष्ट्राच्या सत्तेच्या राजकारणामध्ये कसा प्रभाव घातलेला आहे हे त्यांनी आपल्या विचारातून व्यक्त केले. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये कॉंग्रेसचे प्रभुत्व संपल्यानंतर बहुपक्षीय समीकरणे तयार झाली आहेत. ज्यामध्ये सामाजिक पातळीवर ही स्थित्यंतरे होताना दिसून येतात. त्याचा प्रभाव निवडणूकांमध्ये होताना आपल्याला दिसून येते. निवडणुकीचा अभ्यास करताना भारतातील लोकशाहीची व्याप्ती समजून घेणे आवश्यक आहे. परिस्थितीला समजून घेण्याकरिता सध्यातरी अभ्यास व तथ्यांच्या आधारावर नवीन सिद्धांतिक बांधणी काटेकोरपणे करणे हे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी फील्डमध्ये जाऊन तथ्य गोळा करण्याचे अनुभव घेणे. आवश्यक आहे. त्या आधारावर संशोधन प्रकल्प तयार करावे. असे राज्यशास्त्र विभागाचे प्रमूख डॉ.जांभुळकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना संबोधित केले. या कार्यक्रमाचे संचालन विभागातील प्राध्यापक डॉ. प्रमोद काणेकर यांनी केले तर आभार प्रा.किशोर नैताम यांनी मानले. या विशेष व्याख्यानाच्या यशस्वीतेसाठी विभागातील डॉ. अतुल मून, प्रा. प्रज्ञानंद माटे, इशिका पिंपळकर, पंकज सोमकुवार यांचे महत्वाचे योगदान लाभले.







## संविधान दिन कार्यक्रम

### संविधानाने दिलेल्या अधिकाराबाबत जागरूक व्हा

### विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांचे आवाहन

### ललित कला विभाग व छंद मंदिर येथे संविधान कला महोत्सव

भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकाराबाबत जागरूक होण्याचे आवाहन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक तथा विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ललित कला विभाग व छंद मंदिर आणि संकल्प शिक्षण संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान कला महोत्सव रविवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी ललित कला विभाग येथे पार पडला. या कला महोत्सवाचे उद्घाटन करताना डॉ. खंडाळ मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

कार्यक्रमाला महोत्सवाचे समन्वयक ललित कला विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात व संकल्प शिक्षण संस्था नागपूरचे संचालक डॉ. प्रशांत तांबे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. खंडाळ यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले. संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला दिलेल्या अधिकाराची माहिती प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. संविधान प्रास्ताविकेबाबत त्यांनी विस्तृत विवेचन केले. सोबतच विद्यापीठाच्या वतीने आयोजित होत असलेल्या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांना त्यांचे कलागुण सादर करण्यासाठी एक चांगले व्यासपीठ मिळत असल्याची माहिती दिली. संविधान कला महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित चित्रकला व पथनाट्य स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. प्रशांत तांबे यांनी मार्गदर्शन करताना भारतीय संविधान निर्मितीच्या इतिहासाबाबत माहिती दिली. कार्यक्रमाच्या समन्वयक तथा ललित कला विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी भारतीय संविधानाची माहिती प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन होत असल्याचे सांगितले.

संविधान कला महोत्सवाच्या निमित्ताने चित्रकला व पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. चित्रकला स्पर्धेत १० ते १२ या वयोगटात स्निती नितीन पाटील हिने प्रथम क्रमांक, भावेश एस. रायबोले याने द्वितीय तर अभिनय अंबोडे याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. १३ ते १५ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक आनंदीता, द्वितीय क्रमांक अनुराग डी. वरघणे तर तृतीय क्रमांक युगांत एस. रायबोले याने प्राप्त केला. १६ वर्षे वरील वयोगटाच्या स्पर्धेत दिव्या प्रकाश चव्हाण हिने प्रथम क्रमांक, प्रांजू झाडे हिने द्वितीय तर गुंजन ठाकरे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. चित्रकला स्पर्धेत तीनही वयोगटात एकूण ६० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. पथनाट्य स्पर्धेत बॅरि. शेषराव वानखेडे शिक्षण महाविद्यालयाच्या चमूने प्रथम क्रमांक तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमीने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. पथनाट्य स्पर्धेत ७ संघांनी सहभाग घेतला होता. पुरस्कार वितरण समारंभ जबलपूर येथील माजी विभागीय आयुक्त श्री समान शेखर तसेच विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक श्री. प्रकाश शुक्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमात स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. चित्रकला स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. सदानंद चौधरी, श्री विजय जथे व श्री हर्षद सालपे यांनी कार्य बघितले. पथनाट्य स्पर्धेचे परीक्षण श्री विजय जथे, श्री हर्षद साल्पे व श्री पियुष धुमकेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यापीठाचा ललित कला विभाग व छंद मंदिर संकल्प शिक्षण संस्था नागपूर तसेच मुव्हमेंट २१ चे सदस्य शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.









## भारताचे संविधान महान - डॉ. सच्चिदानंद फुलेकर
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात संविधान दिन कार्यक्रम

जगात सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या भारताचे संविधान महान असून त्याला समजणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. सच्चिदानंद फुलेकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात मंगळवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. फुलेकर मार्गदर्शन करीत होते. यावेळी कार्यक्रमात भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, व्याख्याते म्हणून डॉ. सच्चिदानंद फुलेकर, विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना डॉ. फुलेकर यांनी संविधान निर्मितीची प्रक्रिया आणि तत्कालीन परिस्थितीची माहिती दिली. मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घटना समितीवर येण्याकरिता निवडणुकीत कशाप्रकारे पराभवाचा सामना करावा लागला. घटना समितीवर आल्यानंतर समितीचे प्रभारी अध्यक्ष सचिदानंद सिन्हा यांनी बोलण्याची संधी दिल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिल्याच भाषणात सर्वांची मने जिंकून घेतली. अत्यंत कमी कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेले तसेच जाती- धर्म आदी विविधता असलेल्या भारताचे लिखित संविधान तयार केल्याची माहिती दिली. आज या घटनेला ७५ वर्ष होत असून संपूर्ण देशात अमृत महोत्सवी वर्ष साजरे केले जात आहे. भारतीय संविधानाने नागरिकांना स्वातंत्र्य, समानता, बंधुता आदी विविध प्रकारचे मूलभूत अधिकार दिले आहे. भारतीय संविधानात देशातील प्रत्येक

घटकाबाबत विचार करण्यात आला असून त्यामुळे संविधानाचे विचारपूर्वक अध्ययन केले पाहिजे असे डॉ. फुलेकर म्हणाले. सोबतच त्यांनी संविधानाविषयी विस्तृत माहिती दिली. अध्यक्षीय भाषण करताना अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भारत देश हा विविधतेने नटलेला असून येथील प्रत्येक नागरिकाला न्याय देण्याचा प्रयत्न संविधानाने केला आहे, असे सांगितले. प्रास्ताविकेच्या सुरुवातीलाच असलेला 'आम्ही भारताचे लोक...' हा शब्द अनेक चर्चा मतदानानंतर स्वीकारण्यात आला असे त्यांनी यावेळी सांगितले. सव्वाशे पेक्षा अधिक दुरुस्त्या झाल्या असल्या तरी मूळ घटनेला कोणी हात लावू शकत नाही, हे संविधानाचे वैशिष्ट्य आहे. सोबतच संविधान हे भारताचे सामर्थ्य असल्याचे डॉ. कोरेटी म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक समन्वयक श्री प्रकाश शुक्ला यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला विविध प्राधिकारणींचे सदस्य, सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, सांविधिक अधिकारी, विविध शैक्षणिक विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




## संविधानिक मूल्यांची रुजवणूक करणे आवश्यक

### वसंतराव नाईक शासकीय समाज विज्ञान संस्थेचे डॉ. अनिल बनकर यांचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागात संविधान दिवस निमित्त व्याख्यान

भारतीय संविधानिक मूल्यांची मानसिक रूपाने रुजवणूक करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन वसंतराव नाईक शासकीय समाज विज्ञान संस्थेतील राज्यशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. अनिल बनकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागात ७५ व्या संविधान दिवसानिमित्त मंगळवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी व्याख्यान पार पडले. यावेळी डॉ. बनकर मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषविले. व्याख्याते म्हणून वसंतराव नाईक शासकीय समाज विज्ञान संस्थेतील राज्यशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. अनिल बनकर यांची उपस्थिती होती. 'भारतीय संविधानाची ७५ वर्षांची वाटचाल' या विषयावर पुढे बोलताना डॉ. बनकर यांनी भारतीय सामाजिक व्यवस्थेत बऱ्याच प्रमाणात बदल झाला. मात्र, विविध धर्माचे मान्यतांचे लोक असून देखील येथील संविधान बदलले गेले नाही, याकडे लक्ष वेधले. यावरूनच भारतीय संविधानाचा आराखडा निर्माण करताना तो बारकाईने तयार केला गेला याची जाणीव होते. याउलट एकच धर्म असलेल्या देशात मध्ये निर्माण केलेले संविधान बदल झाल्याचे दिसते. एकधर्मी राष्ट्र असल्याने तो देश टिकेल? याची शाश्वती नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वक्तव्य खरे ठरलेले दिसते, असे डॉ. बनकर म्हणाले.

प्राचीन भारतातूनच संसदीय लोकशाही हे तत्व घेतले आहे. समानते बरोबरच धर्मनिरपेक्ष या तत्त्वाचाही अवलंब केला तर देशातील लोकशाही टिकून राहील. धार्मिकता, हुकूमशाही या तत्त्वामुळे अराजकता निर्माण होईल. देशातील स्थिती बिघडल्याचे अनेक उदाहरणे त्यांनी दिले. स्त्रिया, दलित आणि समाजातील दुर्बल घटकांच्या विकासाकरिता त्यांनी बऱ्याच तरतुदी केल्या आहेत. या तुलनेतच भारतामध्ये महिलांना राष्ट्रपती, त्याचबरोबर प्रधानमंत्री पद भूषवले आहे. हेही केवळ ७५ वर्षातच शक्य झाले, हे भारतीय संविधानाचे सामर्थ्य असल्याचे डॉ. बनकर म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना डॉ. अविनाश फुलझेले यांनी संविधानाच्या उद्देश पत्रिकेतील समता, स्वातंत्र्य व बंधुत्व ची देशाला खरी गरज असल्याचे सांगून देशात बंधुत्वाची भावना निर्माण केली तर बंधुत्व हे देशातील समता व स्वातंत्र्याचे रक्षण करेल असे, सांगितले. कार्यक्रमाचे संचालन भीमराव फुसे तर आभार दिलीपकुमार लेहगावकर यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. रमेश शंभरकर, डॉ. सुभाष नगराळे, प्रा. मंगेश जुनघरे, प्रा. प्रीती वानखेडे, प्रा. प्रमोद चिमूरकर, डॉ. प्रकाश राठोड विभागातील शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्याने उपस्थित होते.



# भारतीय संविधान केवळ एका पिढीसाठी मर्यादित नाही

## विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांचे प्रतिपादन
## पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात विशेष व्याख्यान

भारतीय संविधान हे केवळ एका पिढीसाठी मर्यादित नाही, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी केले. विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात संविधान दिनानिमित्त "अंडरस्टँडिंग फॅब्रिक ऑफ इंडियन कन्स्टिट्यूशन" या विषयावर बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी विशेष अतिथी व्याख्यान पार पडले. यावेळी डॉ. ठावरे मार्गदर्शन करीत होत्या.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभूळकर यांनी भूषविले तर प्रमुख वक्त्या म्हणून पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना भारतीय संविधान हे दुसऱ्या संविधानाची कॉपी नसून ती इतर संविधानाचा अभ्यास करून व समजून घेऊन भारतीय परिस्थितीला अनुसरून तयार केलेला दस्तावेज असल्याची माहिती डॉ. ठावरे यांनी दिली. राष्ट्र उभारणीत भारतीय संविधान महत्त्वाचा पाया आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे उद्दिष्टे आणि स्वातंत्र्य सैनिकांची स्वप्ने उलगडत, भारतीय संविधानाच्या निर्मिती प्रक्रियेत स्वातंत्र्य सैनिकांच्या संघर्षाचे प्रतिबिंब कसे दिसून येते, यावर त्यांनी प्रकाश टाकला. भारतीय संविधान हा अमर, जीवंत आणि स्मारकिय दस्तावेज आहे. संविधान प्रत्येक भारतीयाला स्वीकृत वाटतो, कारण त्यामध्ये विविध संघर्षांवर एकात्मतेने मात करण्याचे सामर्थ्य असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय संविधानाचा आत्मा कलम २१ मध्ये असल्याचे सांगितले. ज्यामध्ये व्यक्तीच्या जीवनाचे आणि स्वातंत्र्याचे संरक्षण समाविष्ट आहे. स्वातंत्र्य हे सर्वसमावेशक असून, प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. संविधानाचे लवचिक आणि कठोर स्वरूप विद्यार्थ्यांना डॉ. ठावरे यांनी समजावून सांगत भारतीय सुरक्षा न्यायालयाची भूमिका कशी महत्त्वाची आहे, यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी संविधानाच्या लवचिकतेमुळे बदलत्या परिस्थितीत तो अधिक प्रासंगिक कसा ठरतो, यावरही भर दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यशास्त्र विभाग प्रमुख

डॉ. विकास जांभुळकर यांनी मार्गदर्शन करताना संविधान हे केवळ एका पिढीसाठी नसून प्रत्येक पिढीसाठी मार्गदर्शक असल्याचे सांगितले. समाजामध्ये होणाऱ्या बदलानुसार संविधानामध्ये बदल करण्याची तरतूद करण्यात आली आहे, तर काही बाबी संदर्भात राजकीय परिस्थितीची जाण ठेवून घटनाकारांनी तेवढेच कठोर बनविले आहे, असे सांगितले. संविधानाच्या लवचिक आणि कठोर स्वरूपावर प्रकाश टाकला. संविधानाचे पावित्र्य, त्यातील समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी यावर भर देत संविधान समाजाच्या बदलत्या गरजेनुसार प्रवृत्त होत राहते, असे त्यांनी सांगितले. संविधान हा भारतीय विविधतेत एकतेचा मुख्य आधार असून, देशाच्या प्रगतीसाठी त्याचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. प्रास्ताविकेचे वाचन डॉ. भूपेंद्र घरत यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. किशोर नैताम यांनी केले तर आभार प्रा. रायन महाजन यांनी मानले. या विशेष व्याख्यानाच्या यशस्वीतेसाठी विभागातील डॉ. अतुल मून, इशिका पिंपळकर, प्रा. प्रज्ञानंद माटे, प्रा. प्राची वासनिक, प्रियंका गावडे, प्रा. सचिन चापके व सर्व प्राध्यापकांचे महत्वाचे योगदान लाभले.



भारताचे संविधान

उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**




# पदव्युत्तर लोकप्रशासन विभागात संविधान दिवस

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर लोक प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य विभागात शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिवस कार्यक्रम पार पडला. यानिमित्ताने अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्षस्थान मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. प्रमुख वक्ते म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर, पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे तर कार्यक्रमाचे आयोजक लोकप्रशासन आणि स्थानिक स्वराज्य विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनीक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. प्रास्ताविकेचे वाचन श्री रमण शिवांकर यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. जितेंद्र वासनीक यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व सांगितले. संविधान हे एक संवादात्मक दस्तऐवज असून त्याची योग्य समज आणि अंमलबजावणी आवश्यक आहे. जेणेकरून भारताच्या प्रगतीशील विकासाच्या बाबी सुकर होतील, असे डॉ. वासनीक म्हणाले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी संविधानातील राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वांचे महत्त्व सांगितले. या तत्त्वांची जनतेत जागरूकता वाढवली पाहिजे. त्यामुळे एक न्याय्य आणि समान समाज निर्माण होईल. एक प्रभावी सार्वजनिक धोरण तयार करण्याचा मार्ग सुकर होईल. न्यायिकदृष्ट्या सक्षम, प्रशासनिकदृष्ट्या योग्य, सामाजिकदृष्ट्या स्वीकार्य आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य असेल, डॉ. जांभुळकर म्हणाले.

पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी लिंगभेदाचे मुद्दे विस्ताराने मांडले. त्यांनी संविधानातील अनुच्छेद १४, १५, १६, २१ आणि २५ यांचा उल्लेख करून प्रत्येक व्यक्तीच्या समस्यांचे महत्त्व स्पष्ट केले. त्यात महिलांचा, मुलांचा, पुरुषांचा, तृतीयपंथींचा आणि इतर घटकांचा समावेश आहे. या सर्व घटकांना योग्य समाधान देणे हे संविधान निर्मात्याला खरी श्रद्धांजली ठरेल, असे त्यांनी सांगितले.

अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्या अध्यक्षीय भाषणात शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांच्या विविधतेला जोडण्याचे महत्त्व सांगितले. आदिवासी लोक जे राज्य धोरणाचे निर्देशक तत्त्व त्यांच्या जीवनशैलीत अंमलात आणतात. त्यांच्याकडून शहरी लोकांनी शिकलं पाहिजे, जेणेकरून शाश्वत जीवनशैलीचा आदानप्रदान होईल, असे डॉ कोरेटी म्हणाले. संविधान एक जिवंत दस्तऐवज आहे, आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी त्याला खुले आणि रचनात्मक दृष्टिकोन देणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना अतिथींनी उत्तर दिली. कार्यक्रमाचे संचालन श्री. श्रीवर्धन केकाटपुरे यांनी केले तर प्रदर्शन हितेश्री दंभरे यांनी मानले. कार्यक्रमालाच्या यशस्वीरेसाठी डॉ. सुप्रिया डेव्हिड, डॉ. धर्मेंद्र तुर्कर, श्री. अंकुश मिरथे आणि कार्यालयीन कर्मचारी संदीप बोरकर यांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले.






# भाषा आपल्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक

## जेएनयूच्या भारतीय भाषा केंद्राचे प्रमुख डॉ. सुधीर प्रताप सिंह यांचे प्रतिपादन

### पदव्युत्तर हिंदी विभागात विशेष व्याख्यान

भाषा आपल्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या भारतीय भाषा केंद्राचे प्रमुख डॉ. सुधीर प्रताप सिंह यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर हिंदी विभागाच्या वतीने 'विकसित भारत@२०२४ : भारतीय भाषांची भूमिका' या विषयावर बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी विशेष व्याख्यान पार पडले. यावेळी डॉ. सुधीर प्रताप सिंह मार्गदर्शन करीत होते. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी भूषविले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या भारतीय भाषा केंद्राचे प्रमुख डॉ. सुधीर प्रताप सिंह, सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना भाषा केवळ अभिव्यक्तीचे माध्यमच नव्हे तर भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी भाषेची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे डॉ. सिंह म्हणाले. भारतातील सर्व बोली आणि भाषांच्या वांशिक चेतनेच्या गाभ्यामध्ये भारतीयत्वाची भावना आहे. भाषेशिवाय ज्ञानाचा कोणताही परिमाण पूर्ण होऊ शकत नाही, असे ते म्हणाले. स्वातंत्र्यानंतर भाषेच्या आधारावर राज्यांची रचना करण्यात आली. त्यामुळे भाषा हा राजकीय मुद्दा बनला आहे. मात्र, राष्ट्रीय एकात्मता हा भारतीय भाषांचा गाभा आहे. त्यामुळे सर्व राजकीय हितसंबंध असूनही राष्ट्रीय एकात्मता अबाधित आहे. भाषांचे महत्त्व ओळखून सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय भाषांमध्ये शिक्षणाची तरतूद केली आहे, असे डॉ. सिंह म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी आज अनेक भारतीय भाषा नामशेष होत असल्याचे सांगितले.भाषा नामशेष होण्याचा अर्थ ज्ञान, अनुभव आणि संवेदना नामशेष होणे आहे.भारतीय भाषांचे जतन आणि सुधारणा करूनच भारतीयत्वाची भावना जोपासली जाऊ शकते. भाषा या आपल्या अस्मितेचे प्रतिबिंब आहेत, परंतु आपल्या मर्यादा नाहीत. राष्ट्रीय एकात्मता ही भारतीय भाषांची महत्त्वाची भूमिका आहे, असे डॉ. पांडे म्हणाले. आभार व्यक्त करताना हिंदी विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ.संतोष गिरहे यांनी भारतीय भाषांचे संरक्षण आणि संवर्धना करण्यासाठी मातृभाषेतून शिक्षण देण्याची आवश्यकता व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. लखेश्वर चंद्रवंशी यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. सुमित सिंह, डॉ. एकादशी जैतवार, डॉ. कुंजन लिल्हारे, प्रा. जागृती सिंह, प्रा. दामोदर द्विवेदी, प्रा. विनय उपाध्याय, ज्ञानेश्वर भेलकर, आकांक्षा बांगर यांच्यासह संशोधक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



## यश नरड यांची DST इन्स्पायर फेलोशिपसाठी निवड

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी यश देवानंद नरड यांची २०२४ या शैक्षणिक सत्रात विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्लीच्या इन्स्पायर फेलोशिपसाठी निवड झाली अहे. शैक्षणिक सत्र २०२४ मध्ये विद्यापिठ परीसरातून यश नरड या एकमात्र विद्यार्थ्यांची इन्स्पायर फेलोशिपसाठी झालेली निवड हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठाला मोठा बहुमान आहे.

यश हा भौतिकशास्त्र विभागातील डॉ. संजय ढोबळे यांचा मार्गदर्शनात संशोधक विद्यार्थी म्हणून एलईडी व सोलर सेलची कार्यक्षमता वाढविण्यासाठी पेरोवस्काइट मटेरियलचे नाविन्यपूर्ण निर्माण व त्यांची उपयोगिता सिध्द करण्यासाठी कार्यरत आहे. त्यामुळे एलईडी व सोलर सेलचे कार्यक्षमता वाढल्यामुळे विजेचे बचत व निर्मिती होणार आहे. हे आजच्या विजेच्या तुटवळ्यामध्ये फार मोठे संशोधनाचे योगदान राहणाथ आहे.

यश नरडला DST ची इन्स्पायर फेलोशिप मिळाल्याबद्दल विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकरे, प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमनकर, मार्गदर्शक डॉ. संजय ढोबळे व इतर प्राध्यापक व संशोधकांनी अभिनंदन व्यक्त केले आहे. यश आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांना देतो.




## विद्यापीठ इन्क्यूबीन फाउंडेशनमध्ये दिवाळी मिलन

### माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी दिल्या शुभेच्छा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या इन्क्युबीन फाउंडेशनमध्ये दिवाळी मिलन सोहळा नुकताच पार पडला. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी सर्व स्टार्टअप करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमामुळे नवीन स्टार्टअप करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट कुलगुरू महोदयांशी चर्चा करण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमाच्या वेळी प्रभारी कुलगुरू डॉ. बोकारे यांनी इन्क्युबीन फाउंडेशनच्या माध्यमातून होत असलेल्या नवीन स्टार्टअपची माहिती घेतली. तसेच नावीन्यपूर्ण संशोधन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. विविध संस्था तसेच उद्योगांच्या माध्यमातून अनेक नवीन प्रकल्पांना या इंक्युबेशन केंद्राच्या सहाय्याने चालना मिळेल असे कुलगुरूंनी सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक होण्यासाठी विद्यापीठ वातावरण निर्मिती तसेच उत्कृष्ट व्यासपीठ

विद्यार्थ्यांना देत असल्याचे कुलगुरू म्हणाले. या कार्यक्रमाने संस्थेतील नवोपक्रम आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याचा नवीन आयाम निर्माण झाला आहे. यावेळी आयआयएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत, इन्क्युबेन फाऊंडेशनचे संचालक डॉ. अभय देशमुख, सीईओ प्रियंका राजावत, इन्क्युबेशन मॅनेजर श्री योगेश कुंटे, तांत्रिक सहाय्यक कर्मचारी श्री योगेश व्यास यांची उपस्थिती होती.




## क्रीडा व सांस्कृतिक

### तलवारबाजीत मंजिरी तांबेला कांस्यपदक
**अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत यश**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची खेळाडू कु. मंजिरी तांबे हिने जम्मू विद्यापीठ जम्मू येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेत फाईल या वैयक्तिक गटात कांस्यपदक प्राप्त केले आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धा जम्मू येथे ६ ते १० नोव्हेंबर दरम्यान जम्मू येथे होत आहे. या स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संलग्नित भंडारा येथील जे. एम. पटेल कॉलेज मधील मंजिरी ही विद्यार्थिनी आहे. भंडारा जिल्ह्यातील खेलो इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रात मंजिरी प्रशिक्षण घेत आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेत वैयक्तिक गटात फॉईल प्रकारात कांस्यपदक प्राप्त करणाऱ्या मंजिरीचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कलुगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी यांच्यासह सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

### 'इंद्रधनुष्य' महोत्सवासाठी विद्यापीठ चमू रवाना
**प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी दाखविली हिरवी झेंडी**




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची चमू इंद्रधनुष्य महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक महोत्सवासाठी रवाना झाली आहे. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात इंद्रधनुष्य सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ सांस्कृतिक चमूला माननीय प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी हिरवी झेंडी दाखवित बुधवार, दिनांक ६ नोव्हेंबर २०२४ रोजी रवाना केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे व विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांची उपस्थिती होती.

विद्यापीठाच्या चमूमध्ये शास्त्रीय एकल गायनामध्ये राधा ठेंगडी, उपशास्त्रीय संगीताकरिता तेजस्विनी खोडतकर, शास्त्रीय वादन चमूत सुयोग देवलकर आणि निधी भालेराव, सुगम संगीताच्या चमूत आयुषी देशमुख, राधा ठेंगडी, तेजस्विनी खोडतकर, आयुषी देशमुख आणि इंद्रायणी इंदूरकर; समूहगीतात निधी रानडे, निधी इंगळे, सुयोग देवलकर आणि निधी भालेराव यांचा समावेश आहे. पाश्चिमात्य एकल गायनात क्षितीज मेश्राम, पाश्चिमात्य एकल वादनात जोश लाल, लोकगीत गायनात सुयोग देवलकर, निधी भालेराव, याद्दिक बंगाले, मधुर बक्षी, समीक्षा परचाके यांचा, तर पाश्चिमात्य समूह गायनात क्षितीज मेश्राम, आदी रिंगे, अनुज गुप्ता, अमनाडा सायमन्स, अक्स बेंजामिन, धनश्री आणि जोश लाल यांचा समावेश आहे. शास्त्रीय नृत्यात कल्याणी चिकुलवार, तर नाट्य चमूत शशांक रहांगडाले, मोहित सरकार, युगलहंस मरकम, चिराग शुक्ला, शिफा अन्सारी, नंदिनी नहाते आणि तानिया पंडित विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील. नकला प्रकारात ब्रायन डोंगरदिवे, वादविवादात मेहंदी शेख आणि विशाल खर्चवाल, तर प्रश्नमंजुषेत प्रथमेश लांजेवार, अनुष्का नाग आणि निर्मित लंगडे यांचा समावेश आहे. चित्रकला गटात रणजीत वानखडे, मृणाली कांबळे, हर्षल लिखार आणि अपूर्वा ताकसांडे यांच्या सह अन्य कलावंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे. इंद्रधनुष्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यापीठाच्या चमूला माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळ यांच्यासह शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.




# 'आव्हान' शिबिरासाठी विद्यापीठ चमू रवाना

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी दाखविली हिरवी झेंडी

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे आयोजित 'आव्हान चान्सलर्स ब्रिगेड २०२४' महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिरासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची चमू रवाना झाली आहे. महाराज बाग स्थित विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरात माननीय प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे यांनी बुधवार दिनांक ६ नोव्हेंबर २०२४ रोजी हिरवी झेंडी दाखवित चमूला रवाना केले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे व विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांची उपस्थिती होती.

'आव्हान चान्सलर्स ब्रिगेड २०२४' या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचे ७ ते १६ नोव्हेंबर, २०२४ दरम्यान संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आयोजन करण्यात आले आहे. पुणे एनडीआरएफचे श्री संतोष सिंग यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. या शिबिरामध्ये २३ विद्यापीठांमधील ६०४ मुले व ४४४ मुली असे एकूण १०४८ विद्यार्थी सहभागी होणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यातून २५ विद्यार्थ्यांची या शिबिरासाठी निवड करण्यात आली होती. यामध्ये १५ मुले तर १० मुलींचा समावेश आहे. या शिबिरात प्रशिक्षणार्थींना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण एनडीआरएफ पुणे यांच्या चमूकडून देण्यात येणार आहे. प्रशिक्षणार्थ्यांना अग्निसुरक्षा, अग्निरोधक, जंगलाची आग, भूकंप, ज्वालामुखी, भुस्खलन, सर्पदंश, ढगफुटी, चक्रीवादळ, जैविक व रासायनिक आपत्ती, आण्विक आपत्ती, पुरग्रस्त व्यवस्थापन, रोप रेस्क्यू, प्रथमोपचार, त्सुनामी अशा विविध आपत्ती व्यवस्थापनाचे धडे प्रशिक्षणातून दिले जाणार आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचा समारोपीय समारंभ १६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांना माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ, सांस्कृतिक समन्वयक श्री प्रकाश शुक्ला यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.



# विद्यापीठाचा तायकांडो (पुरुष व महिला) संघ घोषित

## गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर येथील स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा तायकांडो पुरुष व महिला संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी केली आहे. अमृतसर येथील गुरुनानक देव विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायकांडो स्पर्धेत दोन्ही संघ सहभागी होत आहे. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र- कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व मंडळाच्या सर्व सदस्यांनी खेळाडूंना पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

**तायकांडो पुरुष संघ :** डॉ. हरिभाऊ आदमाने महाविद्यालय सावनेर येथील प्रतीक बोंभारे (५४ वर्ष वजन गटाखालील), श्री बिंझानी सिटी महाविद्यालय नागपूर येथील अभय ठाकूर (५८ वर्ष वजन गटाखालील), नाशिकराव तिरपुडे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा विशाल पूजदेकर (६३ वर्ष वजन गटा खालील), प्रियदर्शनी बी. अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ओम मोरशेट्टीवार (६८ वर्ष वजन गटाखालील) व मृणाल वानखेडे (८७ वर्ष वरील वजन गट), भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथील हिमांशू चव्हाण (७४ वर्ष वजन गटाखालील) व अभिषेक मोहिर्ले (८० वर्ष वजन गटाखालील),रामदेवबाबा अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ऋषिकेश पांडे, राखीव खेळाडू म्हणून राजकमल तिडके महाविद्यालय मौदा येथील कीर्ती देवतळे (६० वर्ष वजन गटाखालील), नॅशनल फायर कॉलेज नागपूर येथील खुशाल गोतराणे (८० वर्ष वजन गटाखालील) यांचा समावेश आहे.

**पुमसे वैयक्तिक प्रकार पुरुष :** भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथील अभिषेक मोहिर्ले तर राखीव म्हणून नागपूर शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथील आदर्श चोपकर यांचा समावेश आहे. पूमसे सांघिक पुरुष संघात भिवापूर महाविद्यालयातील अभिषेक मोहिर्ले, अल्पेश बावनकर हिमांशू चव्हाण यांचा समावेश आहे. पूमसे पुरुष- महिला संघामध्ये भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथील कु. कोमल बुराटकर व हिमांशू चव्हाण यांचा समावेश आहे. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. संतोष चौधरी तर प्रशिक्षक म्हणून तेजांकित भोंगाडे यांची निवड करण्यात आली आहे.

**तायकांडो महिला संघ :** डी. बी. विज्ञान महाविद्यालय गोंदिया येथील शिमन भालाभारे (४६ वर्ष वजन गटाखालील), जी.के. कॉलेज येथील विद्या नागपूरे (४९ वर्ष वजन गटाखालील), भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथील कोमल बुरडकर (५३ वर्ष वजन गटाखालील), नागाजी महाराज एस. एस. महाविद्यालय नागपूर येथील विजया मेश्राम (५७ वर्ष वजन गटाखालील), वैनगंगा शारीरिक शिक्षण महाविद्यालय साकोली येथील मुस्कान राठोड (६२ वर्ष वजन गटाखालील), नाशिकराव तिरपुडे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील सायली अहलावाल (६५ वर्ष वजन गटाखालील), सिटी प्रीमियर कॉलेज नागपूर येथील अंजली कश्यप (७३ वर्ष वजन गटाखालील), सेवादल महिला महाविद्यालयातील वैष्णवी साहू (७३ वर्ष वजन गटा वरील), राखीव खेळाडू म्हणून एस. एन. मोर महाविद्यालय तुमसर येथील विधी देवनगन (५३ वर्ष वजन गटाखालील), डी.डी. भोयर महाविद्यालय मौदा येथील समीक्षा जंगले (५७ वर्ष वजन गटाखालील) यांचा महिला संघात समावेश आहे.

**पूमसे :** पूमसे वैयक्तिक महिला गटात कमला नेहरू महाविद्यालय नागपूर येथील येमिनी पुष्पपातोडे व राखीव म्हणून एस. एन. मोर महाविद्यालय तुमसर येथील निधी देवनगन यांचा समावेश आहे. पूमसे सांघिक गटात आर. एस. मुंडले महाविद्यालय नागपूर येथील सेजल परतेकी, रुतिका माने, वैष्णवी मानकर यांचा समावेश असून संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. जी. वानखेडे तर प्रशिक्षक म्हणून भारती कनोजे जबाबदारी पार पाडणार आहे.



## विद्यापीठाचा वेटलिफ्टिंग पुरुष संघ घोषित

### दक्षिण पश्चिम अंतर विद्यापीठ स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वेटलिफ्टिंग पुरुष संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी केली. आचार्य नागार्जून विद्यापीठ गुंटूर येथे ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०२४ दरम्यान होणाऱ्या दक्षिण पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ स्पर्धेत विद्यापीठाचा संघ सहभागी होणार आहे. विद्यापीठाच्या संघामध्ये नॅशनल फायर कॉलेज नागपूर येथील नरेश कुमार (६७ किलो वजनगट), साकेत शारीरिक शिक्षण महाविद्यालय गोंदिया येथील देवेंद्र गुर्जर ( ७३ किलो वजनगट), अग्निहोत्री अभियांत्रिकी महाविद्यालय वर्धा येथील यश बोरकर (८१ किलो वजनगट) व अनुप भोगले (१०९ किलो वजनगट) तर यशवंत महाविद्यालय वर्धा येथील तेजस सावळे (१०९ किलो वरील वजनगट) यांचा संघात समावेश आहे. विद्यापीठाच्या निवड झालेल्या संघाला माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी शुभेच्छा दिल्या आहे.



## विद्यापीठ खो-खो महिला संघाची घोषणा - पश्चिम क्षेत्रिय खो-खो स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची खो-खो महिला संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक डॉक्टर विशाखा जोशी यांनी केली आहे. बाँसवाडा येथील गोविंद गुरु आदिवासी विद्यापीठ येथे १६ ते १९ डिसेंबर २०२४ दरम्यान आयोजित पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेत विद्यापीठाचा संघ सहभागी होणार आहे.

खो-खो महिला संघामध्ये अरविंद बाबू देशमुख महाविद्यालय भारसिंगी येथील दिव्या सावरकर, रोशनी उमाठे, नबीरा महाविद्यालय काटोल येथील युक्ती वैद्य, नेहा पेठे, यशोदा उमाठे, चेतना सावरकर, समीक्षा गजबे, महिला महाविद्यालय नागपूर येथील रोहिणी दार्रो, नीलिमा पुडो, रेश्मा घावडे, मोनिका करणगामी, ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील मोनिका कुलुरकर, मंजुली बेपी, यशवंत महाविद्यालय सेलू येथील दिशा ठाकरे, ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथील आरती पांडे यांचा तर राखीव खेळाडूंमध्ये यशवंत महाविद्यालय सेलू येथील आश्लेषा झोलेकर, नबीरा महाविद्यालय काटोल येथील मानसी सातफळे, श्री निकेतन कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर येथील गंगा पांचेश्वर, सेवादल महिला महाविद्यालय नागपूर येथील मेघा इंगळे, बॅरि. एस. के. वानखेडे महाविद्यालय मोहपा येथील तेजस्विनी भाकले, महिला महाविद्यालय नागपूर येथील वैष्णवी कुमरे यांचा समावेश आहे. निवड झालेल्या संघाला माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी व मंडळाच्या सर्व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहे.

# नवभारत

## प्रा. काकड़े बने विवि के प्रो-वीसी



■नागपुर, महानगर संवाददाता. नागपुर विश्वविद्यालय के प्रभारी प्र-उपकुलपति के पद की डॉ. राजेंद्र काकड़े को जिम्मेदारी सौंपी गई. उन्होंने गुरुवार को पदभार स्वीकार किया. प्रभारी उपकुलपति डॉ. प्रशान्त बोकारे ने औषधि निर्माणशास्त्र विभाग के प्रा. काकडे को पदभार सौंपने के साथ ही उनका पुष्पगुच्छ देकर स्वागत किया. दरअसल पिछले दिनों उपकुलपति प्रा. सुभाष चौधरी के निधन के बाद प्र-उपकुलपति प्रा. संजय दुधे का भी कार्यकाल खत्म हो गया था. तब से उनकी जगह खाली थी. उक्त पद उपकुलपति के साथ ही बना रहता है. प्रा. बोकारे गड़चिरोली के गोंडवाना विवि के नियमित उपकुलपति हैं. नागपुर का प्रभार होने से वे ज्यादा समय नहीं दे पा रहे हैं. इस हालत में प्र-उपकुलपति की जिम्मेदारी बढ़ जाती है. अब उपकुलपति की अनुपस्थिति में प्रा. काकड़े के होने से व्यवस्था को संभालने में आसानी हो जाएगी. डॉ. काकडे की नियुक्ति नये उपकुलपति के आने तक रहेगी. इस अवसर पर कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, परीक्षा व मूल्यमापन मंडल प्रभारी संचालक डॉ. संजय कवीश्वर, डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. शामराव कोरेटी, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू आदि ने मुलाकात कर विविध विषयों पर चर्चा की.

Nagpur Plus Edition
Nov 01, 2024 Page No. 5
Powered by: navbharatlive.com

# देशोन्नती

## प्रभारी प्र-कुलगुरु बने डॉ. राजेंद्र काकड़े



नागपुर। राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के प्रभारी प्र-कुलगुरु बतौर डॉ. राजेंद्र काकडे ने गुरुवार को पदभार स्वीकारा. प्रभारी कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे ने औषधि निर्माणशास्त्र विभाग के प्राध्यापक डॉ. राजेंद्र काकडे का पदभार स्वीकारने पर पुष्पगुच्छ देकर स्वागत किया.

इस अवसर पर कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित थे. विवि के पूर्व कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी का हाल ही में निधन हुआ. उनके निधन के बाद विवि के प्र-कुलगुरु पद का कार्यकाल खत्म होने संबंधी पत्र कुलगुरु ने विवि को भेजा. डॉ. चौधरी के दो बार निलंबित होने के बावजूद प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे पद पर कायम थे, लेकिन कुलगुरु चौधरी के निधन के चलते आखिरकार डॉ. दुधे को पद छोड़ना पड़ा. इसके बाद महीने भर से प्र-कुलगुरु पद रिक्त था. आखिरकार डॉ. राजेंद्र काकडे को प्र-कुलगुरु पद का प्रभार सौंपा गया.

Main Edition
Nov 01, 2024 Page No. 6

# The Hitavada

Nagpur City Line | 2024-11-03 | Page- 5
ehitavada.com

## RTMNU's PG Department (Psychology) holds activities, assessments on mental health



Students, faculty members of the PG Department (Psych) pose after the event.

■ Staff Reporter

THE Post Graduate Department of Psychology at Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University recently organised an event to raise awareness about mental health issues among students. The event was inaugurated in the presence of Dr Hina Khan, Head of the Department, and Dr Shyam Koreti, Dean of Humanities, who also commended the active participation of students in promoting mental well-being.

The programme featured informative displays of symptoms of mental illness, posters on suicidal ideation, Maslow's hierarchy of needs, and work-life balance.

In engaging activities like 'Stroop Effect' activity, participants explored the impact of cognitive load and multitasking, and in 'Emotion Wheel' activity, attendees identifiedtheir emotions.

Some psychological assessments were also conducted under which job satisfaction survey linked job satisfaction with mental health with participation from 23 individuals, and DASS questionnaire assessed symptoms of depression, anxiety, and stress in 43 participants.

Participants expressed strong desire for regular counselling to address stress and anxiety. Dr Subodh Bansod, Dr Mala Roy, Dr Rubina Ansari, Dr Sumedha Wankhede, Dr Hemant Yawalikar, Dr Dinesh Dhengle, other faculty, research scholars, were present.

Powered by iDocuments

# लोकमत

## डॉ. राजेंद्र काकडे नागपूर विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू



डॉ. प्रशांत बोकारे यांच्याकडून प्रभार स्वीकारताना डॉ. राजेंद्र काकडे.

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून औषधी निर्माणशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र काकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला.

प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रभारी संचालक डॉ. संजय कवीश्वर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतर विद्याशाखीय अभ्यासविद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, आयआयएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ, डॉ. संजय ढोबळे, डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, उपकुलसचिव संजय बाहेकर, डॉ. राजेंद्र उतखेडे, उमेश उईके, सहायक कुलसचिव गणेश कुमकुमवार, संजय भोयर, उद्यान अधीक्षक प्रवीण गोतमारे, कुलगुरू कार्यालयातील सतीश साधनकर आदी उपस्थित होते.

Hello Nagpur
Page No. 6 Nov 01, 2024
Powered by: erelego.com

# लोकसत्ता

## नागपूर विद्यापीठात कर्तव्यपूर्ती सोहळा



लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा कर्तव्यपूर्ती सोहळा गुरुवारी पार पडला. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांच्या अध्यक्षतेखाली जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल यांची उपस्थिती होती. ३० सप्टेंबर रोजी सेवानिवृत्त झालेल्या पुनर्मूल्यांकन विभागातील निम्न श्रेणी लिपिक माया सोमेश्वर गोस्वामी, सामान्य परीक्षा विभागातील परिचारक संजय उत्तमराव घारडे, विद्यापीठ विकास विभागातील परिचारक मोहन दयाराम कार्लेकर तर ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झालेले प्र-कुलगुरू कार्यालयातील वरिष्ठ लघुलेखक प्रतिमा दिलीपकुमार पंडा, बॅरि. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालयातील निवड श्रेणी लिपिक विजय महादेवराव शिरभाते, विद्यापीठ आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळा परिचर प्रकाश शंकरराव घोषीकर, शिष्यवृत्ती कक्षातील परिचारक अशोक चंपतराव तिरमारे आणि सेवा संपुष्ट आल्याने अभियांत्रिकी विभागातील एकत्रित वैतनिक नंदलाल संगुलाल डोंगरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधि महाविद्यालयातील एकत्रित वैतनिक शोभा मधुकर कडू यांचा सत्कार करण्यात आला.

01/11/2024 | Nagpur | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

# लोकसत्ता

## नागपूर विद्यापीठाला अखेर प्रभारी प्र-कुलगुरू मिळाले

### डॉ. राजेंद्र काकडे यांची नियुक्ती



लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून डॉ. राजेंद्र काकडे यांनी गुरुवार ३१ ऑक्टोबरला पदभार स्वीकारला. प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी औषधी निर्माणशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. राजेंद्र काकडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित होते.

नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे नुकतेच निधन झाले. कुलगुरूंच्या निधनानंतर विद्यापीठातील प्र-कुलगुरू पदाचा कार्यकाळ संपुष्टात आल्याचे पत्र कुलपतींनी विद्यापीठाला पाठवले. डॉ. चौधरी यांचे दोनदा निलंबन झाल्यानंतरही प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे पदावर कायम होते. मात्र कुलगुरू चौधरींच्या निधनामुळे अखेर डॉ. दुधे यांना पद सोडावे लागले. कुलगुरू आणि प्र-कुलगुरू या दोन्ही पदावर आता मर्जीतील व्यक्ती नसल्याने विद्यापीठ शिक्षण मंचासाठी हा मोठा धक्का समजला जात होता. महिनाभरापासून प्र-कुलगुरू पद रिक्त होते. अखेर

डॉ. राजेंद्र काकडे यांच्याकडे प्र-कुलगुरू पदाचा प्रभार देण्यात आला. यावेळी वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रभारी संचालक डॉ. संजय कविश्वर, अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, आयआयएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ, डॉ. संजय ढोबळे, डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, उपकुलसचिव संजय बाहेकर, डॉ. राजेंद्र उतखेडे, उमेश उईके, सहाय्यक कुलसचिव गणेश कुमकुमवार, संजय भोयर, उद्यान अधीक्षक प्रवीण गोतमारे, सतीश साधनकर यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# सकाळ

## तीन महिन्यांत मिळविले तब्बल १७ ‘पेटंट’

### नागपूर विद्यापीठाला बहुमानः डॉ. ढोबळे यांच्या संशोधन समूहाची अभूतपूर्व कामगिरी

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ३१ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे व त्यांचे संशोधक विद्यार्थी यासह संशोधक सहयोगी यांनी संयुक्तपणे काम करून त्यांच्या १७ पेटंटला मागील ३ महिन्यात मान्यता प्राप्त झाली आहे. डॉ. संजय ढोबळे व त्यांच्या संशोधक सहयोगींनी ल्युमिनिसेन्स मटेरियल विषयात संशोधन करून पेटंट प्राप्त केले आहे.



नागपूर : पेटंट प्रमाणपत्रासह नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे व त्यांचे संशोधक विद्यार्थ्यांसह संशोधक सहयोगी.

### १५१ शोधनिबंध ‘स्कोपस’वर प्रकाशित

■ डॉ. ढोबळे यांनी आतापर्यंत १५१ शोधनिबंध स्कोपसवर प्रकाशित केले असून त्यांचे सायटेशन १३ हजार ८६६ असून एच. इंडेक्स ४८ आहे. त्याप्रमाणे गुगल स्कॉलरवर त्यांचे सायटेशन १६ हजार १५३ असून ए-इंडेक्स ५४ तर आय-टेन इंडेक्स ४५६ आहे. वरील संशोधनाचा अनुभव बघता त्यांना नुकतेच नेचर या प्रतिष्ठित जर्नलसाठी संपादकीय मंडळावर घेण्यात आले आहे.

### सर्व स्तरावरून कौतुकाचा वर्षाव

■ भौतिकशास्त्र विभागातील शिक्षक व त्यांच्या संशोधक सहकाऱ्यांनी तब्बल १७ पेटंट मिळवत यश प्राप्त केल्याने विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर सर्व शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### सकाळचा माहोल

प्रश्न सुटले, अजून सुटावेत!



एक वृत्तपत्र म्हणून ‘सकाळ’ सर्वार्थाने परिपूर्ण आहे. लहान मुलांपासून तर सर्वच वयातील लोकांनी वाचावा असा ‘सकाळ’चा अंक असतो. सामान्य प्रवाशांचे प्रश्न पद्धतीने ‘सकाळ’ने मांडले आहेत. त्यामुळे प्रशासनाकडून अशा प्रश्नांची दखलसुद्धा घेण्यात आली. या माध्यमातून प्रवाशीहिताच्या अनेक सुधारणा झाल्या. आता ‘सकाळ’ नव्या स्वरूपात येत आहे. त्याचे स्वागत असून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

-वसंतकुमार शुक्ला,
सचिव, भारतीय यात्री केंद्र

Nagpur: Nagpur-Today
01/11/2024 Page No. 6

# दैनिक भास्कर

## दोहा, कतर के अंतरराष्ट्रीय सम्मेलन में डॉ. रतिराम चौधरी का व्याख्यान



ब्यूरो | कामठी/कन्हान. स्थानीय सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय के अंतरराष्ट्रीय सम्मेलन का विषय विचार-विमर्श पेशेवर व्यवसाय विकास के लिए बहुत अमूल्य है, जो नेटवर्किंग, ज्ञान साझा करने और करियर में उन्नति के अवसर प्रदान करता है। साथ ही यह पोरवाल कॉलेज और विश्वविद्यालय के लिए गर्व की बात है। आरटीएम नागपुर विश्वविद्यालय नागपुर के शिक्षक और सीनेट सदस्य तथा सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय के सहयोगी प्रोफेसर और प्रमुख डॉ. रतिराम गोमाजी चौधरी को हमद बिन खलीफा विश्वविद्यालय, दोहा, कतर द्वारा 3 से 5 नवंबर के दौरान एसीएस-आरएससी द्वारा वित्त पोषित ‘स्थायित्व के लिए तालमेल पर अंतरराष्ट्रीय सम्मेलन’ में बात करने के लिए आमंत्रित किया गया है। उनके भाषण का विषय है एक प्रभावी फोटोकैटेलिस्ट के लिए बायोइंस्पायर्ड ग्राफीन-आधारित ZnO नैनोकंपोजिट्स है। उनके शोध क्षेत्र बायोइंस्पायर्ड संश्लेषण, हरित संश्लेषण और पर्यावरण शमन हैं। उन्होंने पोरवाल कॉलेज प्रबंधन (एसपीएम), आरटीएम नागपुर विश्वविद्यालय, कॉलेज के प्राचार्य, सहयोगियों, सहकर्मियों, शोधार्थियों और परिवार के सदस्यों सहित श्रीमती अंकिता चौधरी का आभार माना है।

Mon, 04 November 2024
https://epaper.bhaskarhi

# लोकमत

## विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी रेखाटले महात्मा गांधी यांचे रेखाचित्र



नागपूर विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागात महात्मा गांधी यांच्या रेखाचित्रांसह विद्यार्थी.

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मानसशास्त्र विभागात ‘गांधी इन स्केचेस’ या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांचे मुक्तहस्त रेखाचित्र रेखाटले. महात्मा गांधी यांचे जीवन आणि तत्त्वज्ञान याबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी हा या कार्यक्रमामधील उद्देश होता.

स्पर्धेतील प्रथम क्रमांक भौतिकशास्त्र विभागातील एमएससी प्रथम सेमिस्टरची विद्यार्थिनी मानसी चौरावार हिने पटकावला. द्वितीय क्रमांक मानसशास्त्र विभागातील तृतीय सेमिस्टरची विद्यार्थिनी कोमल नागूरकर हिने तर तृतीय क्रमांक मानसशास्त्र विभागातील प्रथम सेमिस्टरची विद्यार्थिनी अवंतिका चावडे हिने पटकावला.

रेखाचित्र रेखाटन स्पर्धेत विविध पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण १६ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत नोंदणी करीत विविध कलात्मक शैली आणि तंत्रे दर्शवली. सहभागी विद्यार्थ्यांना चित्रकला सामग्री प्रदान करण्यात आली होती. कलाकृती पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना ३ तासांचा अवधी देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी मुक्तहस्त रेखाचित्रातून महात्मा गांधी यांच्या विविध भूमिका, शांतता प्रचारक आणि प्रतीकात्मक लढाईचे दर्शन घडविले. काहींनी महात्मा गांधी यांचा सूतकताई करीत असतानाचे चित्रण रेखाटले. तर काही विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांचा आधुनिक सामाजिक चळवळीवर असलेला प्रभाव चित्रणातून व्यक्त केला. प्रत्येक स्पर्धकाने त्याच्या कलात्मक शैलीतून महात्मा गांधी यांची एक वेगळे रेखाचित्र रेखाटले होते. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांच्या अद्वितीय विचार शक्तीतून महात्मा गांधी यांचे जीवनदर्शन घडले.

Hello Nagpur
Page No. 4 Nov 04, 2024
Powered by: erelego.com

# लोकमत समाचार

## राजेंद्र काकड़े रातुम नागपुर विवि के प्रभारी प्र-कुलगुरु

लोकमत समाचार सेवा

नागपुर: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकड़े ने गुरुवार को पदभार ग्रहण किया.

प्रभारी कुलगुरु औषधी निर्माणशास्त्र विभाग के प्राध्यापक डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, परीक्षा व मूल्यांकन मंडल प्रभारी संचालक डॉ. संजय कवीश्वर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू उपस्थित रहे. इनके अलावा आईआईएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाल, डॉ. संजय ढोबले, डॉ. कीर्तिकुमार रणदिवे, उपकुलसचिव संजय बाहेकर, डॉ. राजेंद्र उतखेडे, उमेश उईके, सहायक कुलसचिव गणेश कुमकुमवार, संजय भोयर, उद्यान अधीक्षक प्रवीण गोतमारे तथा कुलगुरु कार्यालय के सतीश साधनकर, आदि भी उपस्थित थे.

Apna Nagpur
Page No. 4 Nov 01, 2024
Powered by: erelego.com

## विद्यापीठाचे १४ दिवसांत १४ अभ्यासक्रमांचे निकाल

पॉझिटिव्ह प्लस

म. टा. प्रतिनिधी, नागपूर



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आलेल्या हिवाळी परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठाने निकाल घोषित करण्यात गतिशीलता आणत १४ दिवसांत १४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत.

विद्यापीठाच्या पहिल्या टप्प्यातील परीक्षा १५ ऑक्टोबरपासून सुरू झाल्या. या परीक्षांचे निकाल आता लागण्यास सुरुवात झाली आहे. प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी हिवाळी परीक्षांचे सूक्ष्म नियोजन करण्याबाबत परीक्षा विभागाला सूचना दिल्या आहेत. सोबतच परीक्षांविषयी संबंधित कामकाज तसेच निकालाबाबत प्रभारी कुलगुरूंनी सातत्याने पाठपुरावा ... विलंबाने लावण्यासाठी विद्यापीठाच्या या जलदगतीने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.

कमीत कमी दिवसांत निकाल लावण्याबाबत काही दिवसांपूर्वीच प्राचार्य आणि केंद्राधिकारी यांची पूर्व तयारी बैठक परीक्षा भवन येथे झाली. त्यामध्ये सर्व प्रकारची दक्षता घेण्याचे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. संजय कविश्वर यांनी केले होते. त्याचे परिणाम दिसून येत असल्याची चर्चा विद्यापीठ वर्तुळात आहे. योग्य नियोजनामुळे परीक्षेनंतर लवकरात लवकर निकाल लागण्यास सुरुवात झाली आहे. हीच गती उर्वरित अभ्यासक्रमांच्या निकालापर्यंत ...

# लोकमत

## डॉ. राजेंद्र काकडे विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून डॉ. राजेंद्र काकडे यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला. याप्रसंगी प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी काकडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रभारी संचालक डॉ. संजय कविश्वर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी आदी उपस्थित होते.

# देशोन्नती

## भारसिंगी महाविद्यालयाच्या महिला खो-खो संघाला कांस्य पदक



देशोन्नती वृत्तसंकलन

देवग्राम : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाअंतर्गत आंतर महाविद्यालयीन महिला खो-खो स्पर्धेचे आयोजन महिला महाविद्यालय नंदनवन येथे नुकतेच करण्यात आले होते. यात अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय, भारसिंगी येथील महिला संघाने तिसऱ्या स्थानासाठी ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय संघावर ५-४ अशी मात करून एका गड्याने विजय मिळवित कांस्यपदक पटकावले.

खेळाडूंच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश पवार, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. मनोजकुमार वर्मा, प्रा. राजेंद्र घोरपडे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थ्यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

Nagpur Edition
Nov 03, 2024 Page No. 7
Powered by: erelego.com

# देशोन्नती

## नागपूर विद्यापीठात कर्तव्यपूर्ती सोहळा

देशोन्नती वृत्तसंकलन



नागपूर: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा कर्तव्यपूर्ती सोहळा ३१ ऑक्टोबर रोजी पार पडला. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांच्या अध्यक्षतेखाली जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात झालेल्या कार्यक्रमात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल यांची उपस्थिती होती. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल यांच्या शुभहस्ते ३० सप्टेंबर रोजी सेवानिवृत्त झालेल्या पुनर्मूल्यांकन विभागातील निम्न श्रेणी लिपिक माया सोमेश्वर गोस्वामी, सामान्य परीक्षा विभागातील चपरासी संजय उत्तमराव घारडे, विद्यापीठ विकास विभागातील चपरासी मोहन दयाराम कार्लेकर तर ३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त झालेले प्र-कुलगुरू कार्यालयातील वरिष्ठ लघुलेखक प्रतिमा दिलीपकुमार पंडा, बॅरि. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालयातील निवड श्रेणी लिपिक विजय महादेवराव शिरभाते, विद्यापीठ आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळा परिचर प्रकाश शंकरराव घोषीकर, शिष्यवृत्ती कक्षातील चपराशी अशोक चंपतराव तिरमारे आणि सेवा संपुष्ट आल्याने अभियांत्रिकी विभागातील एकत्रित वैतनिक नंदलाल संगुलाल डोंगरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील एकत्रित वैतनिक शोभा मधुकर कडू यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुढील आयुष्याकरिता तसेच दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन दीपक घोडमारे यांनी केले तर उपस्थित यांचे आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला विविध प्राधिकारणींचे सदस्य, सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, विविध शैक्षणिक विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

Nagpur Edition
Nov 04, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

# लोकमत

## क्रॉस कंट्री स्पर्धेत आर्ट्स अँड कॉमर्स नाइट कॉलेजचे यश



लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत आर्ट्स अँड कॉमर्स नाइट कॉलेजच्या गौरव खोडतकर या विद्यार्थ्याने १० किलोमीटर अंतर ३१ मिनिट ४३.२२ सेकंदात पूर्ण करून दुसरे स्थान, तर प्रणय माहुले यो ३२ मिनिटे ५३.६६ सेकंदात पूर्ण करून सहावे स्थान पटकावले. हे दोन्ही विद्यार्थी मंगोलोर विद्यापीठ मंगलागंगोत्री येथे होणाऱ्या अखिल भारतीय क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. हिरालाल मेश्राम, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. राजेश बावनकुळे, महात्मा बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सचिव मंगेश कामडी व पदाधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे.

Hello Nagpur
Page No. 5 Nov 04, 2024
Powered by: erelego.com

देशोन्नती

# विद्यार्थ्यांनी रेखाटले महात्मा गांधी यांचे रेखाचित्र

पदव्युत्तर मानसशास्त्र विभागात चित्रकला स्पर्धा



लोकमत

# क्रॉस कंट्री स्पर्धेत आर्ट्स अँड कॉमर्स नाइट कॉलेजचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत आर्ट्स अँड कॉमर्स नाइट कॉलेजच्या गौरव खोडतकर या विद्यार्थ्याने १० किलोमीटर अंतर ३१ मिनिट ४३.२२ सेकंदात पूर्ण करून दुसरे स्थान, तर प्रणय माहुले यो ३२ मिनिटे ५३.६६ सेकंदात पूर्ण करून सहावे स्थान पटकावले. हे दोन्ही विद्यार्थी मंगोलोर विद्यापीठ



मंगलागंगोत्री येथे होणाऱ्या अखिल भारतीय क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. हिरालाल मेश्राम, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. राजेश बावनकुळे, महात्मा बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सचिव मंगेश कामडी व पदाधिक

Hello Nagpur
Page No. 5 Nov 04, 20
Powered by: erelego.co

लोकशाही वार्ता DATE 4/11/2024 PAGE No. : 10

# रातुम नागपूर विद्यापीठात कर्तव्यपूर्ती सोहळा

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

लोकशा वार्ता/नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा कर्तव्यपूर्ती सोहळा गुरुवार, ३१ ऑक्टोबरला पार पडला. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांच्या अध्यक्षतेखाली जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात झालेल्या कार्यक्रमात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ३० सप्टेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झालेल्या पुनर्मूल्यांकन विभागातील निम्न श्रेणी लिपिक



माया सोमेश्वर गोस्वामी, सामान्य परीक्षा विभागातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी संजय उत्तमराव घारडे, विद्यापीठ विकास विभागातील चतुर्थ श्रेणी कर्मचाकी मोहन दयाराम कार्लेकर तर ३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त झालेले प्र-कुलगुरू कार्यालयातील वरिष्ठ लघुलेखक प्रतिमा दिलीपकुमार पंडा, बॅरि. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालयातील निवड श्रेणी लिपिक विजय महादेवराव शिरभाते, विद्यापीठ आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळा परिचर प्रकाश शंकरराव घोषीकर, शिष्यवृत्ती कक्षातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी अशोक चंपतराव तिरमारे आणि सेवा संपुष्ट आल्याने अभियांत्रिकी विभागातील एकत्रित वेतनिक नंदलाल संगुलाल डोंगरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील एकत्रित वेतनिक शोभा मधुकर कडू यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुढील आयुष्याकरिता तसेच दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन दीपक घोडमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला विविध प्राधिकारणींचे सदस्य, सर्व विद्याशाखांचे अधिष्ठता, विविध शैक्षणिक विभागाचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पुण्य नगरी

# 'इंद्रधनुष्य' महोत्सवासाठी विद्यापीठ चमू रवाना

**डॉ. राजेंद्र काकडेंनी दाखविली हिरवी झेंडी**



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची चमू इंद्रधनुष्य महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक महोत्सवासाठी रवाना झाली आहे. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात इंद्रधनुष्य सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ सांस्कृतिक चमूला प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी हिरवी झेंडी दाखवीत ६ नोव्हेंबर रोजी रवाना केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवायोजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे व विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ उपस्थित होते.

विद्यापीठाच्या चमूमध्ये शास्त्रीय एकल गायनामध्ये राधा ठेंगडी, उपशास्त्रीय संगीताकरिता तेजस्विनी खोडतकर, शास्त्रीय वादन चमूत सुयोग देवलकर आणि निधी भालेराव, सुगमसंगीताच्या चमूत आयुषी देशमुख, राधा ठेंगडी, तेजस्विनी खोडतकर, आयुषी देशमुख आणि इंद्रायणी इंदुरकर, समूहगीतात निधी रानडे, निधी इंगळे, सुयोग देवलकर व निधी भालेराव यांचा समावेश आहे. पाश्चिमात्य एकल गायनात क्षितिज मेश्राम, पाश्चिमात्य एकल वादनात जोश लाल, लोकगीत गायनात सुयोग देवलकर, निधी भालेराव, याद्विक बंगाले, मधुर बक्षी, समीक्षा परचाके तर पाश्चिमात्य समूहगायनात क्षितिज मेश्राम, आदी रिंगे, अनुज गुप्ता, अमनाडा सायमन्स, अक्स बेंजामिन, धनश्री आणि जोश लाल यांचा समावेश आहे. शास्त्रीय नृत्यात कल्याणी चिकुलवार, तर नाट्य चमूत शशांक रहांगडाले, मोहित सरकार, युगलहंस मरकाम, चिराग शुक्ला, शिफा अन्सारी, नंदिनी नहाते आणि तानिया पंडित विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील. नकलाप्रकारात ब्रायन डोंगरदिवे, वादविवादात मेहंदी शेख आणि विशाल खर्चवाल, तर प्रश्नमंजूषेत प्रथमेश लांजेवार, अनुष्का नाग आणि निर्मित लंगडे यांचा समावेश आहे. चित्रकला गटात रणजित वानखडे, मृणाली कांबळे, हर्षल लिखार, अपूर्वा ताकसांडेसह इतर कलावंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे. इंद्रधनुष्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यापीठाच्या चमूला प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळसह शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

Nagpur Edition
Nov 07, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

# 'इंद्रधनुष्य'साठी विद्यापीठाची चमू रवाना

■ अकोल्यात होणार सांस्कृतिक महोत्सव

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची चमू 'इंद्रधनुष्य' या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक महोत्सवासाठी बुधवारी रवाना झाली. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात यंदा ७ ते ११ नोव्हेंबरदरम्यान हा सांस्कृतिक महोत्सव होणार आहे.

या चमूला नागपूर विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी हिरवी झेंडी दाखविली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे व विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ उपस्थित होते.





अकोला येथे आयोजित इंद्रधनुष्य महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक महोत्सवासाठी चमू बुधवारी रवाना झाली.

विद्यापीठाच्या चमूत शास्त्रीय एकल गायनात राधा ठेंगडी, उपशास्त्रीय संगीताकरिता तेजस्विनी खोडतकर, शास्त्रीय वादन चमूत सुयोग देवलकर आणि निधी भालेराव, सुगम संगीताच्या चमूत आयुषी देशमुख, राधा ठेंगडी, तेजस्विनी खोडतकर, आयुषी देशमुख आणि इंद्रायणी इंदूरकर; समूहगीतात निधी रानडे, निधी इंगळे, सुयोग देवलकर आणि निधी भालेराव यांचा समावेश आहे. पाश्चिमात्य एकल गायनात क्षितिज मेश्राम, पाश्चिमात्य एकल वादनात जोश लाल, लोकगीत गायनात सुयोग देवलकर, निधी भालेराव, याद्विक बंगाले, मधुर बक्षी, समीक्षा परचाके यांचा, तर पाश्चिमात्य समूह गायनात क्षितिज मेश्राम, आदी रिंगे, अनुज गुप्ता, अमनाडा सायमन्स, अक्स बेंजामिन, धनश्री आणि जोश लाल यांचा समावेश आहे.

शास्त्रीय नृत्यात कल्याणी चिकुलवार, तर नाट्य चमूत शशांक रहांगडाले, मोहित सरकार, युगलहंस मरकम, चिराग शुक्ला, शिफा अन्सारी आणि तानिया पंडित विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील. नकला प्रकारात ब्रायन डोंगरदिवे, वादविवादात मेहंदी शेख आणि विशाल खर्चवाल, तर प्रश्नमंजूषेत प्रथमेश लांजेवार, अनुष्का नाग आणि निर्मित लंगडे यांचा समावेश आहे. चित्रकला गटात रणजित वानखडे, मृणाली कांबळे, हर्षल लिखार आणि अपूर्वा ताकसांडे यांच्यासह अन्य कलावंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे. इंद्रधनुष्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यापीठाच्या चमूला प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्यासह शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

देशोन्नती

# 'इंद्रधनुष्य' महोत्सवासाठी विद्यापीठ चमू रवाना

प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी दाखविली हिरवी झेंडी





हे सुद्धा दाखवतील आपले कौशल्य



# डॉ. थोटे यांना 'श्री गुरुदेव जीवनगौरव' प्रदान

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या तुकडोजी महाराज अध्यासन विभागप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांना गुरुकुंज मोझरी येथे राज्यस्तरीय श्री गुरुदेव जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त गुरुकुंज आश्रम व पद्मश्री फाउंडेशन तसेच साक्षी कथक डान्स अकादमी, वर्धा यांच्यावतीने या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. तुकडोजी महाराजांच्या संदेशाच्या प्रचारासाठी अध्यासनाने केलेल्या कार्याबद्दल डॉ. थोटे यांनी सन्मानित करण्यात आले.

पुण्य नगरी

City Pulse

## डॉ. विजयलक्ष्मी थोटे यांचा गुरुकुंज येथे सन्मान



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन विभागप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांचा गुरुकुंज मोझरी येथे सन्मान करण्यात आला. ग्रामगीतेच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे ग्रामविकासाची संकल्पना सुंदर पद्धतीने अध्यासन विभागाकडून राबविली जात आहे. त्यात अंध व अनिष्ट रूढी, कर्मकांड, व्यसनमुक्ती अभियान, स्त्रीशिक्षणाचे महत्त्व यावर समाजजागृतीचे कार्य अध्यासनाकडून होत

# 'इंद्रधनुष' महोत्सव के लिए विश्वविद्यालय की टीम रवाना

**प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. काकड़े ने दिखाई हरी झंडी**

भास्कर संवाददाता | नागपुर

राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर यूनिवर्सिटी की टीम इंद्रधनुष महाराष्ट्र राज्य आंतर विश्वविद्यालय सांस्कृतिक महोत्सव के लिए रवाना हो गई है। अकोला के डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विश्वविद्यालय ने इंद्रधनुष सांस्कृतिक





**यह करेंगे प्रतिनिधित्व :** विवि की टीम में शास्त्रीय एकल गायन में राधा ठेंगड़ी, उपशास्त्रीय संगीत के लिए तेजस्विनी खोडतकर, शास्त्रीय वादन टीम में सुयोग देवलकर और निधि भालेराव, सुगम संगीत टीम में आयुषी देशमुख, राधा ठेंगड़ी, तेजस्विनी खोडतकर, आयुषी देशमुख और इंद्रायणी इंदूरकर, समूह गायन टीम में निधि रानडे, निधि इंगले, सुयोग देवलकर और निधि भालेराव शामिल हैं। पश्चिमी एकल गायन में क्षितिज मेश्राम, पश्चिमी एकल वादन में जोश लाल, लोक गायन में सुयोग देवलकर, निधि भालेराव, यादविक बंगाले, मधुर बक्शी, समीक्षा परचाके, जबकि पश्चिमी समूह गायन में क्षितिज मेश्राम, आदि रिंगे, अनुज गुप्ता, अमनाडा सायमंस, अक्स बेंजामिन, धनश्री और जोश लाल शामिल हैं। शास्त्रीय नृत्य में कल्याणी चिकुलवार, नाट्य टीम में शशांक रहांगडाले, मोहित सरकार, युगलहंस मरकम, चिराग शुक्ला, शिफा अंसारी, नंदिनी नहाते और तानिया पंडित विश्वविद्यालय का प्रतिनिधित्व करेंगे।

**डिबेट और पेंटिंग की टीम :** नकल में ब्रायन डोंगरदिवे, डिबेट में मेहंदी शेख और विशाल खर्चवाल, क्विज में प्रथमेश लांजेवार, अनुष्का नाग और निर्मित लंगड़े, पेंटिंग टीम में रणजीत वानखड़े, मृणाली कांबले, हर्षल लिखार और अपूर्व ताकसांडे शामिल हैं। इंद्रधनुष्य प्रतियोगिता में भाग लेने वाले छात्रों को प्रभारी कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकड़े, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यार्थी विकास विभाग के निदेशक डॉ. विजय खंडाल सहित शिक्षक, अधिकारी व कर्मचारियों ने शुभकामनाएं दी हैं।

epaper-bhaskarhindi.com

लोकसत्ता



# विद्यार्थ्यांनी रेखाटले महात्मा गांधी यांचे रेखाचित्र

लोकसत्ता प्रतिनिधी

## पदव्युत्तर मानसशास्त्र विभागात चित्रकला स्पर्धा

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मानसशास्त्र विभागात 'गांधी इन स्केचेस' या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांचे मुक्तहस्ते रेखाचित्र रेखाटले. महात्मा गांधी यांचे जीवन व तत्त्वज्ञान याबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिना खान यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता व कलात्मक अभिव्यक्ती निर्माण होण्यास वाव मिळाला.

डॉ. हिना खान यांनी महात्मा गांधी यांच्या तत्त्वज्ञानाची महत्ता कलात्मक अभिव्यक्तीच्या माध्यमातून अधोरेखित केली. आजच्या काळात महात्मा गांधी यांच्या शिकवणींच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना महात्मा गांधी यांच्या विचारांचा वारसा त्यांनी कलात्मक स्वरूपात रूपांतरित करण्यास प्रोत्साहित केले.

स्पर्धेतील प्रथम क्रमांक भौतिकशास्त्र विभागातील एम.एस्सी. प्रथम सत्राची विद्यार्थिनी मानसी चौरावार हिने पटकावला. द्वितीय क्रमांक मानसशास्त्र विभागातील तृतीय सत्राची विद्यार्थिनी कोमल नागूरकर हिने तर तृतीय क्रमांक मानसशास्त्र विभागातील प्रथम सत्राची विद्यार्थिनी अवंतिका चावडे हिने पटकावला.

रेखाचित्र रेखाटन स्पर्धेत विविध पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण १६ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत नोंदणी करीत विविध कलात्मक शैली व तंत्रे दर्शवली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुबोध बन्सोड यांनी केले. प्रा. प्राजक्ता जोशी यांनी कार्यक्रम समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली.

06/11/2024 | Nagpur | Page : 12
Source : https://epaper.loksatta.com

# दोहा येथे भाषणासाठी डॉ. चौधरी आमंत्रित

**काटोल**



व्यवसायवाढ, नेटवर्किंग, ज्ञानाची देवाणघेवाण आणि करिअरच्या प्रगतीसाठी परदेशात आंतरराष्ट्रीय परिषदेतील चर्चा अमूल्य आहे. ही महाविद्यालय आणि विद्यापीठासाठी अभिमानाची बाब आहे. रातुम नागपूर विद्यापीठ नागपूरचे शिक्षक, सिनेट सदस्य, सेठ केसरीमल पोरवाल कॉलेज कामठी सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख डॉ. रतिराम गोमाजी चौधरी यांना हमाद बिन खलीफा विद्यापीठ दोहा, कतार यांनी 'एसीएस-आरएससी स्पॉन्सर्ड इंटरनॅशनल कॉन्फरन्स'मध्ये भाषणासाठी आमंत्रित केले आहे. ३ ते ५नोव्हेंबरदरम्यान 'सिनर्जी फॉर सस्टेनेबिलिटी'वर आंतरराष्ट्रीय परिषद २०२४ हा त्यांच्या चर्चेचा विषय आहे. बायोइन्स्पायर्ड ग्राफीन-आधारित झेडएनओ नॅनोकॉम्पोजिट्स फॉर अ इफेक्टिव्ह फोटोकॅटलिस्ट, बायोइन्स्पायर्ड संश्लेषण, हरित संश्लेषण आणि पर्यावरणीय शमन हे त्यांचे संशोधनक्षेत्र आहे. याबद्दल पोरवाल कॉलेज व्यवस्थापन (एसपीएम), रातुम नागपूर विद्यापीठ चौधरी) त्यांचे त्यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

# एस. बी. सिटी कॉलेजला जेतेपद



**आंतरमहाविद्यालय खो-खो स्पर्धा**

Nagpur Edition
Nov 04, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

bhaskarhindi.com/c/76185004



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य तसेच कामठी येथील सेठ केसरीमल पोरवाल कॉलेजमधील सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख डॉ. रतिराम गोमाजी चौधरी यांची कताद, दोहा येथील हमाद बिन खलीफा विद्यापीठात आयोजित एसीएस-आरएससी प्रायोजित आंत... आले. ३ ते ५ ... व्यावसायिक ... आणि करिअ...

पुण्य नगरी

# 'इंद्रधनुष्य' महोत्सवासाठी विद्यापीठ चमू रवाना

**डॉ. राजेंद्र काकडेंनी दाखविली हिरवी झेंडी**



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची चमू इंद्रधनुष्य महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक महोत्सवासाठी रवाना झाली आहे. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात इंद्रधनुष्य सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ सांस्कृतिक चमूला प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी हिरवी झेंडी दाखवीत ६ नोव्हेंबर रोजी रवाना केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवायोजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे व विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ उपस्थित होते.

विद्यापीठाच्या चमूमध्ये शास्त्रीय एकल गायनामध्ये राधा ठेंगडी, उपशास्त्रीय संगीताकरिता तेजस्विनी खोडतकर, शास्त्रीय वादन चमूत सुयोग देवलकर आणि निधी भालेराव, सुगमसंगीताच्या चमूत आयुषी देशमुख, राधा ठेंगडी, तेजस्विनी खोडतकर, आयुषी देशमुख आणि इंद्रायणी इंदुरकर, समूहगीतात निधी रानडे, निधी इंगळे, सुयोग देवलकर व निधी भालेराव यांचा समावेश आहे. पाश्चिमात्य एकल गायनात क्षितिज मेश्राम, पाश्चिमात्य एकल वादनात जोश लाल, लोकगीत गायनात सुयोग देवलकर, निधी भालेराव, याद्विक बंगाले, मधुर बक्षी, समीक्षा परचाके तर पाश्चिमात्य समूहगायनात क्षितिज मेश्राम, आदी रिंगे, अनुज गुप्ता, अमनाडा सायमन्स, अक्स बेंजामिन, धनश्री आणि जोश लाल यांचा समावेश आहे. शास्त्रीय नृत्यात कल्याणी चिकुलवार, तर नाट्य चमूत शशांक रहांगडाले, मोहित सरकार, युगलहंस मरकाम, चिराग शुक्ला, शिफा अन्सारी, नंदिनी नहाते आणि तानिया पंडित विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील. नकलाप्रकारात ब्रायन डोंगरदिवे, वादविवादात मेहंदी शेख आणि विशाल खर्चवाल, तर प्रश्नमंजूषेत प्रथमेश लांजेवार, अनुष्का नाग आणि निर्मित लंगडे यांचा समावेश आहे. चित्रकला गटात रणजित वानखडे, मृणाली कांबळे, हर्षल लिखार, अपूर्वा ताकसांडेसह इतर कलावंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे. इंद्रधनुष्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यापीठाच्या चमूला प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळसह शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

Nagpur Edition
Nov 07, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

# विद्यार्थ्यांनी रेखाचित्रांमधून साकारले गांधीजी

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मानसशास्त्र विभागात 'गांधी इन स्केचेस' विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांची रेखाचित्रे काढली. महात्मा गांधी यांचे जीवन आणि तत्त्वज्ञान याबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानावरून बोलताना मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. हीना खान यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जीवन तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले.

या स्पर्धेत भौतिकशास्त्र विभागातील एमएस्सी प्रथम सत्राची विद्यार्थिनी मानसी चौरावार हिने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक मानसशास्त्र विभागातील तृतीय सत्राची विद्यार्थिनी कोमल नागूरकर हिने, तर तृतीय क्रमांक मानसशास्त्र विभागातील प्रथम सत्राची विद्यार्थिनी अवंतिका चावडे हिने पटकावला. रेखाचित्र रेखाटन स्पर्धेत विविध पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार तसेच सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. सुबोध बन्सोड यांनी केले. कार्यक्रम समन्वयक म्हणून प्रा. प्राजक्ता जोशी यांनी जबाबदारी सांभाळली.



देशोन्नती

# विवि की टीम अमरावती रवाना

नागपुर, राप्र संवादक

संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय में आयोजित 'आव्हान चांसलर्स ब्रिगेड-2024' महाराष्ट्र अंतर विश्वविद्यालय आपदा पूर्व तैयारी प्रशिक्षण के लिए राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय की टीम रवाना हुई. महाराजबाग स्थित प्रशासकीय परिसर में प्रभारी प्र-उपकुलगुरु प्रा. राजेंद्र काकडे ने हरी झंडी दिखाकर टीम को रवाना किया.

इस अवसर पर राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे व विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाल उपस्थित थे. 'आव्हान चांसलर्स ब्रिगेड' प्रशिक्षण 16 नवंबर तक अमरावती विवि में दिया जाएगा.



पुणे एनडीआरएफ के संतोष सिंह के हाथों प्रशिक्षण का उद्घाटन होगा.

इसमें 23 विश्वविद्यालयों के 604 छात्रों और 444 छात्राओं सहित कुल 1048 विद्यार्थी शामिल हो रहे हैं. नागपुर विवि के परिक्षेत्र के प्रत्येक जिले से 25 विद्यार्थियों का प्रशिक्षण के लिए चयन किया गया है. इनमें 15 छात्रों और 10 छात्राओं का समावेश है. इसमें एनडीआरएफ पुणे द्वारा अग्निसुरक्षा, अग्निरोधक, जंगल में आग, भूकंप, ज्वालामुखी, भूस्खलन, सर्पदंश, बादल फटना, चक्रवाती तूफान, जैविक व रासायनिक आपदा, आण्विक आपदा, बाढ़ग्रस्त प्रबंधन, रोप रेस्क्यू, प्रथमोपचार आदि का प्रशिक्षण दिया जाएगा.

Main Edition
Nov 08, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

**TheHitavada**
Nagpur City Line | 2024-11-12 | Page- 2
ehitavada.com

## Yellow-coloured LED bulbs can curb...

Spike in cases of chikungunya, especially this year, has been quite significant. Those infected are still not fully recovered from the effects of chikungunya.

Hence Dr Dhoble said the usage of yellow coloured LED bulb is very effective in keeping mosquitoes at bay. Some of the leading electrical appliances companies have introduced the yellow-coloured LED bulb, but these days citizens are preferring cool day light, which emanates white-coloured, in their households. Citizens can put up yellow-coloured bulbs at verandah, in garden, and at entry so as to curb mosquito menace.

The students who formed the research team included Mukesh Turkane, Siddheshwar Nagpure and Pranali Zade, all students of Nano Science and Technology course, and Dr Abhijit Kadam, Research student.



RTMNU students with their guide Dr Sanjay Dhoble who conducted research on curbing mosquito menace using yellow-coloured LED bulb.

Powered by iDocuments

**पुण्यनगरी**

## जोतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाला विजेतेपद

### नागपूर विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग पुरुष व महिला स्पर्धा



Nagpur Edition
Nov 08, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

**तरुण भारत**
Apla Nagpur | 2024-11-08 | Page- 6
epaper.tarunbharat.net

## विद्यापीठाचा बास्केटबॉल संघ जाहीर

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पुरुष बास्केटबॉल संघ जाहीर करण्यात आला. ग्वाल्हेर (म. प्र.) येथे १५ ते २० नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या पश्चिम क्षेत्रीय स्पर्धेत नागपूरचा संघ सहभागी होणार आहे.
**संघ :** सिद्धेश कुळकर्णी, हिमांशू शेंडे, शुभम राऊत (सर्व डीएनसी), राजेश्वर पदरेशी, पीयूष पिढेकर, (एलाईट कॉलेज, सावनेर), तारण कक्कड, सिद्धेश बुराडे, (जीएच रायसोनी कॉलेज), प्रथम गुप्ता (हिस्लॉप), सार्थक घुळघळे, (डॉ. आंबेडकर कॉलेज), तन्मय चौधरी (ईश्वर देशमुख शा. शि. महा.), श्याम खेडकर (नागपूर शा. शि.), पार्थ बोरकुटे, (रामदेवबाबा); राखीव खेळाडू : वल्लभ त्रिवेदी (जीएच रायसोनी), रवी चौधरी (हिस्लॉप), वंशवर्धन सोरटे (वायसीसीई), परीक्षित दातीर (सेंट व्हिन्सेंट इंजि.), सारंग उमाटे (डीएनसी) व आदर्श मोहर्ले (कला-वाणिज्य ...) यांचा संघात समावेश आहे. ... शारीरिक शिक्षण मंड... विशाखा जोशी यांनी ...

**पुण्यनगरी**

## मंजिरी तांबे कांस्यपदकाची मानकरी

### अ. भा. आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धा



**नागपूर :** जम्मू येथे जम्मू विद्यापीठाच्या यजमानपदाखाली सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापाठीच्या मंजिरी तांबे हिने कांस्यपदक जिंकण्याची कामगिरी केली. स्पर्धेत महिलांच्या फॉइल या वैयक्तिक प्रकारात मंजिरीने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत कांस्यपदक जिंकण्याची कामगिरी केली. मंजिरी तांबे ही भंडारा येथील जे. एम. पटेल महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. यासह मंजिरी भंडारा जिल्ह्यातील खेलो इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत आहे. अ. भा. आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेत फॉइल प्रकारात कांस्यपदक विजेत्या मंजिरीचे रातुम नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी अभिनंदन केले.

Nagpur Edition
Nov 08, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

**तरुण भारत**
Apla Nagpur | 2024-11-09 | Page- 3
epaper.tarunbharat.net

## तलवारबाजीत मंजिरी तांबेला कांस्य

### अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत यश




◆ **नागपूर, ८ नोव्हेंबर**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची खेळाडू मंजिरी तांबे हिने जम्मू विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेत फाईल प्रकारात कांस्यपदक प्राप्त केले आहे.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धा जम्मू येथे होत आहे. या स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित भंडारा येथील जे. एम. पटेल महाविद्यालयातील मंजिरी सहभागी झाली आहे. भंडारा जिल्ह्यातील खेलो इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रात मंजिरी प्रशिक्षण घेत आहे. ◄*(तभा वृत्तसेवा)*



**सकाळ**

## कुलगुरू निवड प्रक्रिया पुढल्या महिन्यात

इच्छुकांची फिल्डिंग सुरू : भेटीगाठीही वाढल्या

## डॉ. संजय ढोबळे समूहाचे महिन्य

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान



**देशोन्नती**

## डासांना पळवून लावतो एलईडीचा पिवळा प्रकाश

देशोन्नती वृत्तसंकलन

एमएससी नॅनोसायन्स विद्यार्थ्यांचे डॉ. संजय ढोबळे यांच्या मार्गदर्शनात संशोधन

यांनी केले अभिनंदन



**TIMES**

## Working in night shifts is demanding: Expert

### Understanding Central Body Clock For Better Sleep, Says UK Researcher

Sarfaraz.Ahmed
@timesofindia.com



Michael Hastings

**Nagpur:** Mitigation strategies can be initiated to assist individuals, particularly those engaged in rotating night shifts, experiencing sleep disorders by comprehending how the central body clock or the circadian rhythm functions normally, said Michael Hastings, group researcher leader, Medical Research Council, Lab of Molecular Biology, Cambridge, United Kingdom.

Hastings is visiting the city alongside other researchers for a pan-India workshop jointly organised by Nagpur University in association with Journal of Neuroendocrinology and British Society for Neuro-endocrinology at the department of pharmaceutical sciences on Amravati Road.

Speaking to TOI, Hastings said his team is investigating which brain regions regulate body rhythms, mood fluctuations and physical capabilities. "How does it typically function and, if it malfunctions, how does it influence disease. We possess an internal clock and when we alter time cells, adaptation becomes challenging. Each hour difference requires approximately one day to synchronise," he said.

Hastings said the research on circadian rhythm could also help prevent adverse occurrences such as heart attacks or strokes through appropriate drug development.

"More significant in contemporary society would be shift work. Working night shifts is exceptionally demanding. It imposes a substan... toll on your wellbeing. I... manageable when young, ... becomes increasingly d... cult with age. Since our bo... transition between dayt... and night-time states, ... must examine how they ... spond to medicines, toxin... diseases," he said.

He added, "If you can c... prehend normal proce... that govern our 24-hour ... stem, then we can derive s... tions to help alleviate the ... verse effects of shift wor... assist all sleep-deprived i... viduals. Similarly, we k... certain aspects of hear... tacks or stroke, such as t... predominant occurrenc... the morning. People ge... and their circadian clock ... gers activity. With blood p... sure elevated during thi... me, a comorbid person ... experience heart attack. ... ce, we must focus on mor... blood pressure," he said.

## एलईडीचा पिवळा प्रकाश, घरातील पळवेल डास

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

- नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे संशोधन, मिळाले आंतरराष्ट्रीय पेटंट

**हे करून बघा...**

- घरांत लावा पिवळ्या रंगांचे विद्युत दिवे
- दार आणि खिडक्यांसमोर, बगिच्यात हवेत पिवळे दिवे
- पिवळ्या रंगांच्या भिंती असतील तर डास कमी

डासांपासून सुटका होण्यासाठी गोवऱ्यांचा धूर जाळण्यापासून ते अंगाला विशिष्ट क्रीम लावण्यापर्यंत कितीतरी उपाय केले जातात. रॅकेट्स हातात घेऊन नेम धरीत डासांना मारण्याचे कौशल्यही अनेकांनी हस्तगत केले असते. या जोडीने आता डासांपासून सुटका करून घेण्यासाठी एलईडी दिव्यांचा पिवळा प्रकाशाचे नवे शस्त्र शोधून काढण्यात आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या नॅनोसायन्सच्या विद्यार्थ्यांनी हे संशोधन केले आहे.

नागपूरसह अनेक शहरांमध्ये डासांपासून होणाऱ्या आजारांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या डासांना पळवून लावण्यासाठी नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी एलईडी दिव्यांच्या पिवळ्या प्रकाशाचा वापर केला आहे. या संशोधनासाठी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पेटंटही मिळाले आहे. भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले आहे. एमएससी नॅनोसायन्स व नॅनो टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी एलईडीच्या पिवळ्या प्रकाशाचा वापर करीत एक नवे उपकरण शोधून काढले आहे. विद्यार्थ्यांनी लाल, निळ्या आणि पिवळ्या रंगाचा वापर करून हे संशोधन केले. त्यापैकी, पिवळ्या रंगाच्या प्रकाशापासून डास दूर पळतात, असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. हा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नॅनोसायन्स व नॅनो टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी मुकेश तुरकाने, सिद्धेश्वर नागपुरे, प्रणाली झाडे व संशोधक विद्यार्थी डॉ. अभिजित कदम यांचा समावेश होता. लोकांच्या दृष्टीने उपयोगी संशोधन केल्याबद्दल आणि आंतरराष्ट्रीय पेटंट मिळाल्याबद्दल नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांनी विद्यार्थी आणि डॉ. ढोबळे यांचे कौतुक केले आहे.



डॉ. संजय ढोबळे आणि संशोधक विद्यार्थी.

## डॉ. रतिराम चौधरी यांना 'बेस्ट यंग केमिस्ट्री टीचर' पुरस्कार




**नागपूर :** सेठ केसरीमल पोरवाल कॉलेज, कामठी येथील सहयोगी प्राध्यापक तथा रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रतिराम चौधरी यांना नुकतेच 'बेस्ट यंग केमेस्ट्री टीचर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. असोसिएशन ऑफ केमिस्ट्री टीचर्स, मुंबईतर्फे दिला जाणारा हा पुरस्कार डॉ. चौधरी यांना मिझोरमचे मंत्री डॉ. वनललथाना, मिझोरम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिवाकर डेक्का यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मिझोरमची राजधानी आयझॉल येथे आयोजित रसायनशास्त्र शिक्षकांच्या राष्ट्रीय अधिवेशनात डॉ. चौधरी यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मागील वर्षी रातुम नागपूर विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट संशोधक पुरस्कार-२०२३ डॉ. चौधरी यांना मिळाला आहे. याशिवाय पेटंट, समीक्षा, संशोधन, पुस्तके, पुस्तक-चॅप्टर आणि थीमॅटिक इश्यूच्या स्वरूपात त्यांनी १५५ दस्तऐवज प्रकाशित केले आहेत.

**लोकमत**

## डासांना पळवायचे? एलइडीचा पिवळा लाइट लावा...



घरामध्ये पिवळ्या रंगाचे विद्युत दिवे लावून त्यातून डासांना दूर ठेवता येईल, असे संशोधकांनी सिद्ध केले आहे. घराच्या मुख्य दारासमोर व खिडकी समोर, बगिच्यात पिवळ्या रंगाचे विद्युत दिवे किंवा भिंती पिवळ्या रंगांनी पेंट केलेल्या असेल तर त्या ठिकाणी डास येणार नाही किंवा कमी येतील.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** विविध आजारास कारणीभूत ठरणाऱ्या डासांना एलईडीचा पिवळा प्रकाश पळवून लावत असल्याचे संशोधन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील एमएससी नॅनोसायन्सच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. भौतिकशास्त्र विभागातील प्रा. डॉ. संजय ढोबळे यांच्या मार्गदर्शनात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीयस्तरावरील पेटंट प्राप्त झाले आहे.

विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. ढोबळे यांनी एमएससीच्या नॅनोसायन्स व नॅनो टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत डासांना एलईडीच्या पिवळ्या प्रकाशामुळे दूर ठेवता येते, यावर उपयुक्त संशोधन करीत एका नवीन उपकरणाच्या आधारे शोधून काढले. यामध्ये नॅनोसायन्स व टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी मुकेश तुरकाने, सिद्धेश्वर नागपुरे, प्रणाली झाडे व संशोधक विद्यार्थी डॉ. अभिजित कदम यांच्या सोबत नॅनो टेक्नोमटेरियलवर आधारित एलईडीच्या प्रकाशित होणाऱ्या विभिन्न प्रकाशाच्या सहाय्याने यात लाल, निळा व पिवळा रंगाद्वारे असे शोधून काढले आहे की, डास हा पिवळ्या रंगापासून दूर राहतो. डॉ. संजय ढोबळे यांचे संशोधनाचे कार्य एलईडी व त्यांची उपयोगिता यावर आहे. त्यातूनच पिवळ्या रंगापासून डास दूर पळतात यावर त्यांनी शिक्कामोर्तब केले आहे. असे समाजाला उपयोगी असणारे संशोधन त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांच्या साहाय्याने जनतेसमोर ठेवले, हे विशेष.



Nagpur Main
Page No. 5 Nov 12, 2024
Powered by: erelego.com

**नवभारत**

## एलईडी की पीली लाइट से दूर भागते हैं मच्छर

### विवि के छात्रों का रिसर्च, अंतरराष्ट्रीय पेटेंट मिला





■ नागपुर, महानगर संवाददाता. नागपुर विश्वविद्यालय के छात्रों ने महत्वपूर्ण शोध किया है. एलईडी की पीली रोशनी विभिन्न बीमारियों का कारण बनने वाले मच्छरों को दूर भगाती है. भौतिकी विभाग के प्रोफेसर डॉ. संजय ढोबले के मार्गदर्शन में शोध कर रहे छात्रों को अंतरराष्ट्रीय पेटेंट प्राप्त हुआ है. एमएससी नैनोसाइंस एवं नैनोटेक्नोलॉजी के विद्यार्थियों ने शोध में पाया कि एलईडी की पीली रोशनी से मच्छरों को दूर रखा जा सकता है. मुकेश तुरकाने, सिद्धेश्वर नागपुरे, प्रणाली झाडे व संशोधक विद्यार्थी डॉ. अभिजीत कदम के शोध में पता चला कि मच्छर पीली लाइट के करीब नहीं आते. डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया आदि बीमारियों के कारण हर वर्ष अनेक लोग हलाकान होते हैं. मच्छरों के संक्रमण के कारण हर परिवार में कुछ संख्या में इसके मरीज पाए जाते हैं.

बाजार में मच्छरों से बचने के लिए तरह-तरह के उपाय मौजूद हैं और हर व्यक्ति उसी के अनुसार अपनी सुरक्षा करता है. घर में मुख्य दरवाजे और खिड़की के सामने पीली बिजली की लाइटें लगाकर मच्छरों को दूर रखा जा सकता है. अगर बगीचे में पीली लाइटें लगाई जाएं या दीवारों को पीले रंग से रंगा जाए तो मच्छर नहीं आएंगे या कम हो जाएंगे. शोध के मुताबिक इससे घर में रहने वाले लोग मच्छरों से बचे रहेंगे और मलेरिया, डेंगू, और चिकनगुनिया जैसी बीमारियों से दूर रहेंगे. संशोधन कार्य के दौरान ही डॉ. ढोबले ने अंतरराष्ट्रीय पेटेंट प्रस्तुत किया, जिसे मान्यता भी मिल गई. एमएससी में पढ़ने वाले छात्रों के शोध को पेटेंट यह विवि में पहली घटना है. इस अवसर पर प्रभारी उपकुलपति डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-उपकुलपति डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर ने भी छात्रों का अभिनंदन किया.

Nagpur Plus Edition
Nov 12, 2024 Page No. 3
Powered by: navbharatlive.com

**देशोन्नती**

## मानसोपचार तज्ज्ञांची समाजासाठी महत्वपूर्ण भूमिका

### प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांचे प्रतिपादन ▪ मानसिक आरोग्य जागरूकता कार्यक्रमास सुरुवात

देशोन्नती वृत्तसंकलन



**दैनिक भास्कर** नागपुर मंगलवार, 12 नवंबर 2024

## बड़ी खोज...एलईडी की पीली रोशनी से भागेंगे मच्छर

एमएससी नैनो ... के छात्रों का अह...

भास्कर संवाददाता, नागपुर. एलईडी की पीली रोशनी से विभिन्न बीमारियों का कारण बनने वाले मच्छरों को भगाना अब संभव है। नागपुर विश्वविद्यालय के एमएससी नैनो साइंस के छात्रों ने जनहित में यह महत्वपूर्ण शोध किया है। छात्रों के इस अनुसंधान को अंतरराष्ट्रीय पेटेंट भी प्राप्त हुआ है। भौतिकी विभाग के वरिष्ठ प्रोफेसर डॉ. संजय ढोबले के मार्गदर्शन में एमएससी नैनो साइंस एवं नैनो टेक्नोलॉजी के छात्रों ने यह शोध किया है।



**रोकथाम की लगातार कोशिश :** दरअसल, डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया आदि बीमारियों के पीछे मुख्य कारक मच्छर माने गए हैं। इनकी उत्पति की रोकथाम की कोशिशें लगातार की जा रही हैं। इस मानसून के दौरान शहर में डेंगू-चिकनगुनिया का काफी प्रकोप बढ़ा था। मच्छरों के संक्रमण के कारण अस्पतालों में मरीजों की बढ़ती संख्या के कारण बेड और दवाईयों की कमी पड़ रही थी। डेंगू और चिकनगुनिया के मामलों में हुई वृद्धि पर खुद हाई कोर्ट ने भी चिंता जताई थी।

**अलग-अलग रोशनी का प्रयोग :** एलईडी की पीली रोशनी से मच्छरों को दूर रख... यह उपयोगी शोध एक नए उपकरण पर आधारित है। इसमें नैनो साइंस एवं टेक्नोलॉजी के छात्र मुकेश ... नागपुरे, प्रणाली झाडे और डॉ. अभिजीत कदम शामिल हैं। नैनो टेक्नो मैटेरियल पर आधारित एलईडी से ... अलग-अलग रोशनी की मदद से यह पता चला है कि मच्छर लाल, नीले और पीले रंग के जरिए पीले ... डॉ. संजय ढोबले का शोध कार्य एलईडी और उनके अनुप्रयोगों पर आधारित है। उन्होंने इस बात की पुष्टि ... पीले रंग से दूर भागते हैं। खास बात यह है कि समाज के लिए उपयोगी ऐसे शोध को उन्होंने अपने छात्र... के सामने रखा। यह समाजोपयोगी शोध करने हेतु प्रभारी कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरु ... कुलसचिव डॉ. राजू हिवसे और भौतिकी विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमनकर ने शोधकर्ताओं का अ...

**इस तरह से करें उपयोग :** इस शोध के मुताबिक, घर में मुख्य दरवाजे और खिड़की के सामने पीली लाइट लगाकर मच्छरों को दूर रखा जा सकता है। अगर बगीचे में पीली लाइटें लगाई जाएंगी या दीवारों को पीले रंग से रंगा जाए तो मच्छर नहीं आएंगे या कम हो जाएंगे। इससे घर में रहने वाले लोग मच्छरों से बचे रहेंगे और मलेरिया, डेंगू और चिकनगुनिया जैसी बीमारियों से दूर रहेंगे।

**पौधे से मच्छरों को रोक... थी सफलता :** मच्छरों से बच... तरह-तरह के उपाय मौजूद हैं और ... अनुसार अपनी सुरक्षा करता है। आ... लिए पौधों से लेकर नई तकनीकों ... रहा है। इसके पहले भी डॉ. संजय ढो... पौधे से मच्छरों के प्रजनन को रोकने...

Tue, 12 November 2024
https://epaper.bhaskarhindi.com/c/76215794

## नवराष्ट्र

**पेटंट मिळवले • एमएससी नॅनोसायन्स विद्यार्थ्यांचे संशोधन : पिवळ्या प्रकाशाने ठेवता येते दूर**

# एलईडी लाईट लावा, डासांना पळवा

नागपूर, सिटी रिपोर्टर. विविध आजारास कारणीभूत ठरणाऱ्या डासांना एलईडीचा पिवळा प्रकाश पळवून लावत असल्याचे समाजपयोगी महत्त्वपूर्ण संशोधन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील एमएससी नॅनोसायंसच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक संजय ढोबळे यांच्या मार्गदर्शनात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील पेटंटही प्राप्त झाले आहे. डासांना एलईडीच्या पिवळ्या प्रकाशाद्वारे दूर ठेवता येत असल्याचे उपयुक्त संशोधन एका नवीन उपकरणाच्या आधारे या टीमने सिद्ध केले आहे. नॅनोसायंस व टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी मुकेश तुरकाने, सिद्धेश्वर नागपुरे, प्रणाली झाडे व संशोधक विद्यार्थी डॉ. अभिजीत कदम यांनी नॅनो टेक्नो मटेरियलवर आधारित एलईडीच्या प्रकाशाच्या सहाय्याने वेगवेगळ्या रंगांच्या परिमाचे संशोधन करण्यात आले. त्यात डास पिवळ्या रंगापासून लांब राहत असल्याचे निष्पन्न झाले आहे. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रशांत बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू राजेंद्र काकडे, कुलसचिव राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख ओमप्रकाश चिमणकर यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आहे.

### ओझोलाही ठरतो परिणामकारक

शहर असो की खेडे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया आदी आजाराने सर्वांना त्रस्त केले आहे. डासांच्या संसर्गामुळे प्रत्येक परिवारात काही प्रमाणात त्याचे रुग्ण आढळतात. डासांपासून स्वतःचे रक्षण करण्याकरिता बाजारात वेगवेगळे प्रकारचे उपाय सांगितले जातात. त्यानुसार प्रत्येक व्यक्ती आपली सुरक्षा करतो हे देखील खरे आहे. आज वनस्पतीपासून तर नवीन तंत्रज्ञानापर्यंतचा वापर करून देखील डासांपासून संरक्षण केले जाते. यापूर्वी ओझोला या वनस्पती पासून डासाचे प्रजनन थांबविता येते याबाबत माहिती प्रत्येक व्यक्तीजवळ पोहोचविण्यास ढोबळे यांनी प्रयत्न केले आहे.



### असा करा घरात उपयोग

- घरामध्ये पिवळ्या रंगाचे विद्युत दिवे लावून त्यातून डासांना दूर ठेवता येईल असे संशोधनात सिद्ध झाले आहे.
- घराच्या मुख्य दारासमोर व खिडकी समोर, बगीच्यात पिवळ्या रंगाचे विद्युत दिवे किंवा भिंती पिवळ्या रंगानी पेंट केलेल्या तरी डास येणार नाही किंवा कमी येतील.
- घरातील व्यक्तींची डासांपासून सुरक्षा होऊन ते मलेरिया, डेंग्यू व चिकनगुनिया आदी आजारांपासून लांब राहता येईल.
- या संशोधनावर कार्य करीत ढोबळे यांनी आंतरराष्ट्रीय पेटंट प्रस्तुत केले होते. ते मान्य झाले आहे.
- एमएससीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय पेटंट मान्य झाल्याबद्दल संपूर्ण टीमवर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.

Orange City Metro Edition
Nov 12, 2024 Page No. 1
Powered by: NavaRashtra.com

## YOUR NEWS

# Mental health awareness prog held at Nagpur University



A mental health awareness programme, 'Sukoon' was held at **Jyotiba Phule Educational Campus** on Tuesday. Postgraduate psychology department organised the event for **third consecutive year**. Addressing the gathering **pro-vice-chancellor** of Nagpur University **Rajendra Kakade** stressed that mental health is an essential issue that affects **all sections of society**, and praised the department's efforts in organising such programmes. The **'Sukoon' programme**, which aims to raise awareness about mental health and provide resources for **emotional well-being**, included various activities such as informational stalls, **mental health assessment stations**, and **interactive stalls** focused on mental health activities. In addition, department students presented a **street play**. Prominent attendees included **Hina Khan**, Subodh Bansod, **Dheeraj Kadam** and Shabbir Pathan. **(Reporting by Devyani Naukarkar)**

## देशोन्नती

# महानुभाव युवा समाजासाठी आदर्श : प्रा.भारतभूषण शास्त्री

### तळोधी (बा) येथे महानुभाव युवा संमेलन



सावरगाव : सर्वज्ञ श्री चक्रधर विचारमंच तळोधी (बा) द्वारा आयोजित श्रीदत्त मंदिर तळोधी (बा) शताब्दी महोत्सव व राज्यस्तरीय श्री चक्रपाणी प्रभू जन्मोत्सव व ग्रामस्वच्छता अभियान समारोपीय सोहळ्याच्या निमित्ताने एक दिवसीय महानुभाव युवा संमेलन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भगवान श्रीचक्रधर स्वामी अध्यासनाचे प्रमुख प्रा. भारतभूषण शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

या संमेलनामध्ये चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ जिल्ह्यातील अनेक महानुभाव युवक - युवती सहभागी झाले होते. अविनाश कारंजेकर, अनुज मंचावार, दुष्यंत बारसागडे, तुलसी गेडाम, गौरव इंदूरकर, नयन खोब्रागडे, डॉ. धनश्री लोनपांडे, प्रतीक्षा जाधव, हर्षदा राखोंडे, डॉ. गोविंदशास्त्री जामोदेकर, ॲड.आनंद घुटके, पू.आर्जवमुनी पंजाबी यांनी यामध्ये हिरारीने सहभाग नोंदवला होता.

या संमेलनात कृषी, पर्यावरण, साहित्य, धर्म, राजकारण आदी विषयांवर युवकांनी संवाद साधला. वर्तमान काळात येणारी आव्हाने पेलण्याची क्षमता युवकांमध्ये निर्माण व्हावी असा सूर संमेलनातुन निघाला. महानुभाव युवा निर्व्यसनी असल्यामुळे निरोगी शरीर, संतुलित आहार, योग्य नियोजन प्रणाली त्यांच्या जीवनावर आहे. महानुभावांची आचार पद्धती, महानुभावांची विचार पद्धती यांचा समाजावर एक चांगला प्रवाह वर्तमान काळामध्ये दिसून येत आहे. युवा पिढीला सशक्त बनविण्यासाठी महानुभाव युवा हा आदर्शवत आहे असे मत प्रा. भारतभूषण शास्त्री यांनी केले. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या विचारांमध्ये संवैधानिक मूल्य दिसून येतात असे मत ॲड.आनंद घुटके, नागभिड यांनी व्यक्त केले.

Chandrapur Edition
Nov 15, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

## लोकमत

# तळोधी बा. येथे महानुभाव युवा संमेलन

## संपूर्ण विदर्भातील महानुभाव तरुण-तरुणींची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

तळोधी बा. : श्री चक्रधर विचारमंच तळोधी (बा.) द्वारा आयोजित श्रीदत्त मंदिर तळोधी (बा.) शताब्दी महोत्सव व राज्यस्तरीय श्री चक्रपाणी प्रभू जन्मोत्सव व ग्रामस्वच्छता अभियानाच्या समारोपीय सोहळ्याच्या निमित्ताने एकदिवसीय महानुभाव युवा संमेलन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनाचे प्रमुख प्रा. भारतभूषण शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

या संमेलनामध्ये चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ जिल्ह्यातील अनेक महानुभाव युवक-युवती सहभागी झाले होते. अविनाश कारंजेकर, अनुज मंचावार, दुष्यंत बारसागडे, तुलसी गेडाम, गौरव इंदूरकर, नयन खोब्रागडे, डॉ. धनश्री लोनपांडे, प्रतीक्षा जाधव, हर्षदा राखोंडे, ...देकर, ॲड. ... पंजाबी यांनी यामध्ये हिरिरीने सहभाग नोंदवला होता.



कार्यक्रमाला उपस्थित प्रा. भारतभूषण शास्त्री व मान्यवर.

या संमेलनात कृषी, पर्यावरण, साहित्य, धर्म, राजकारण आदी विषयांवर युवकांनी संवाद साधला. वर्तमान काळात येणारी आव्हाने पेलण्याची क्षमता युवकांमध्ये निर्माण व्हावी, असा सूर संमेलनातून निघाला. महानुभाव युवा निर्व्यसनी असल्यामुळे निरोगी शरीर, संतुलित आहार, योग्य नियोजन प्रणाली त्यांच्या जीवनावर आहे. महानुभावांची आचार पद्धती, महानुभावांची विचार पद्धती यांचा समाजावर एक चांगला प्रवाह वर्तमान काळामध्ये दिसून येत आहे. युवा पिढीला सशक्त बनविण्यासाठी महानुभाव युवा हा आदर्शवत आहे असे मत प्रा. भारतभूषण शास्त्री यांनी व्यक्त केले. या संमेलनाचे ॲड. संतोष रामटेके प्रास्ताविक, तृषाल रामटेके सूत्रसंचालन तर निकेश अलोने यांनी आभार प्रदर्शन केले.

Hello Chandrapur
Page No. 4 Nov 15, 2024
Powered by: erelego.com

## लोकमत समाचार

# पीली एलईडी लाइट से मच्छरों की नो एन्ट्री



संजय ढोबले व शोध कार्य में शामिल विद्यार्थी.

नागपुर: पिछले कुछ महीनों में शहर में मच्छरों की तादाद बढ़ने से नागरिक चिकुनगुनिया, डेंगु व मलेरिया जैसी बीमारियों से त्रस्त थे. राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के एमएससी नैसोसाइंस के विद्यार्थियों द्वारा किए गए शोध में पाया गया कि विभिन्न बीमारियों का कारण बनने वाले मच्छरों को एलईडी की पीली लाइट से भगाया जा सकता है. नागपुर विवि के भौतिकी विभाग के प्रो. डॉ. संजय ढोबले के मार्गदर्शन में शोध कर रहे विद्यार्थियों को अंतरराष्ट्रीय पेटेंट प्राप्त हुआ है.

विवि के भौतिकीशास्त्र विभाग के वरिष्ठ प्रो. डॉ. ढोबले ने एमएससी के नैनोसाइंस व नैनो टेक्नोलॉजी के विद्यार्थियों का मार्गदर्शन करते हुए एक नए उपकरण के आधार पर मच्छरों को एलईडी की पीली लाइट से दूर रखा जा सकता है, यह उपयोगी शोध किया. इस शोध टीम में नैनोसाइंस एवं टेक्नोलॉजी के विद्यार्थी मुकेश तुरकाने, सिद्धेश्वर नागपुरे, प्रणाली झाड़े व शोध विद्यार्थी डॉ. अभिजित कदम का नाम शामिल है. डॉ. ढोबले का शोध कार्य एलईडी और उनके अनुप्रयोगों पर है. उन्होंने उन्होंने यह शोध नागरिकों के समक्ष रखा है.

Apna Nagpur
Page No. 3 Nov 13, 2024
Powered by: erelego.c

## लोकमत

# मानसोपचार तज्ज्ञांची समाजासाठी महत्त्वपूर्ण भूमिका

### प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांचे विचार



पदव्युत्तर शैक्षणिक मानसशास्त्र विभागातर्फे आयोजित मानसिक आरोग्य ... विद्यार्थी-विद्यार्थिनी.

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : समाजातील सर्व घटकांच्या दृष्टीने मानसिक आरोग्य हा विषय अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच मानसोपचार तज्ज्ञांची भूमिका समाजाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे एक उत्कृष्ट मानसोपचार तज्ज्ञ म्हणून स्वतःला अग्रेशित करण्याचे आवाहन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी विद्यार्थ्यांना केले.

पदव्युत्तर शैक्षणिक मानसशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'सुकून' मानसिक आरोग्य जागरूकता कार्यक्रमाचे उद्घाटन मंगळवारी झाले. महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील पी. व्ही. नरसिंहराव वाचनालयासमोरील उद्यानात हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. हिना खान, डॉ. सुबोध बनसोड, डॉ. धीरज कदम, वसंतराव नाईक शासकीय सामाजिक संस्था येथील मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. शब्बीर पठाण प्रामुख्याने उपस्थित हो... तिसऱ्या वर्षी 'सुकून'चे ... आले.

यानिमित्त विद्यार्थ्यांनी ... मानसिक आरोग्याचा वि... माहिती दर्शविणारे ३, ... तपासणी करणारे ३, तर ... आधारित ३ असे एकू... लावण्यात आले होते. ... आधारित नुक्कड नाटक ... विभागातील शिक्षक डॉ. ... जोशी, अंजन माहेश्व... नीलिमा रामटेके, सना शे... अभिजित तितरमारे या... कार्यक्रमात तिरपुडे ब्ल... शिबिर घेण्यात आले ... यांच्याकडून दंत तपासणी ... तपासणी करण्यात ... डायग्नोस्टिक सेंटरच्या ... थॅलेसेमिया व सिकलसे... आली.

Hello Nagpur

## कॅम्पस कनेक्ट

# उत्तम पीएचडीसाठी विशेष प्रमाणपत्र

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

देशभरातील पीएचडी अंतर्गतंच्या संशोधनाची गुणवत्ता वाढावी, याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विशेष प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. विविध विद्यापीठांतून उत्तम दर्जाचा पीएचडी प्रबंध सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र आयोगाकडून दिले जाणार आहे.

भारतीय विद्यापीठांमध्ये चांगल्या दर्जाच्या संशोधनाला चालना मिळावी याकरिता 'पीएचडी एक्सलन्स सायटेशन' योजना सुरू केली आहे.



चित्र : एआय

विविध शाखांतील संशोधकांना या योजनेंतर्गत सन्मानित केले जाणार आहे.

### विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय

सायन्स, इंजिनीअरिंग आणि टेक्नॉलॉजी, भारतीय भाषा, समाजशास्त्रे, कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट शाखेतील संशोधकांच्या प्रबंधाचा या सन्मानाकरिता विचार केला जाईल. दरवर्षी देशभरातून अशा दहा संशोधकांची निवड करण्यात येईल. ज्यावर्षी विद्यार्थ्यांना पीएचडी मिळाली असेल त्याच्या पुढील वर्षात प्रमाणपत्रे देण्यात येतील.

एका वर्षासा... प्रत्येक शाखेतून ... पाठविता येतील. ... शिक्षक दिना... आयोगाच्यावतीने ... या प्रक्रियेचे वे... संकेतस्थळावर दे... निवडीकरिता अ... आले असून य... निवड समिती उत... निवड करेल आ... शिफारस करेल ... करण्याकरिता ... उपलब्ध करून ...

## नवभारत

# 'वोकल फॉर लोकल' से रोजगार

### विवि के नवनियुक्त प्रभारी प्रो-वीसी से 'नवभारत' की चर्चा

**कौशल, इनोवेशन, स्टार्टअप पर रहेगा जोर**

■ दिनेश टेकाडे @ नवभारत.

नागपुर. नागपुर विश्वविद्यालय का कार्यक्षेत्र भंडारा, गोंदिया, वर्धा जिले तक है. ग्रामीण भागों में प्राकृतिक संसाधनों की कमी नहीं है. इन्हीं प्राकृतिक संसाधनों के उपयोग से छात्रों में रोजगार क्षमता विकसित की जा सकती है. विविध तरह के प्रशिक्षण और रिसर्च कर कंपनियों के साथ करार कर ग्रामीण भागों में रोजगार का सकारात्मक माहौल तैयार किया जा सकता ...

## तरुण भारत

Apla Nagpur | 2024-11-15 | Page- 1
epaper.tarunbharat.net

# सेवादल महिला महाविद्यालयात प्लेसमेंट ड्राईव्ह

नागपूर : सेवादल महिला महाविद्यालयात एक्स्चेंजर्स सॉफ्टवेअर कंपनीच्या वतीने, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ प्लेसमेंट सेलच्या पुढाकारात प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आला. परीक्षा लेखी व मौखिक स्वरूपात घेण्यात आली. महाविद्यालयाच्या २६ विद्यार्थिनी लेखी परीक्षेत उत्तीर्ण झाल्या. मंजिरी बाविस्कर, आदिती गावंडे, उन्नती खंते या ३ विद्यार्थिनींनी यश संपादन केले. त्यांना एक्स्चेंजर्स कंपनीद्वारे २०२५ पासून रुजू होण्यासाठी पत्र देण्यात आले. सेवादल संस्थेचे अध्यक्ष संजय शेंडे, रातुम विद्यापीठ प्लेसमेंट सेलचे अधिकारी डॉ. भूषण महाजन, संस्था सचिव डॉ. किरण बारई, प्रभारी प्राचार्या डॉ. निरूपमा ढोबळे, डॉ. प्रभाकर भंडारी यांनी या यशाबद्दल विद्यार्थिनींचे कौतुक केले.

## नागपुर संदेश

नागपुर, 16 नवंबर 2024 7

### नागपुर विश्वविद्यालय में

# 'न्यूरोएंडोक्रिनोलॉजी' पर कार्यशाला

**आज आखिरी दिन**

### फार्मास्युटिकल साइंसेज का संगठित विभाग

नागपुर. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय में 'न्यूरोएंडोक्रिनोलॉजी' पर एक अखिल भारतीय कार्यशाला का आयोजन किया है. कार्यशाला का आयोजन विश्वविद्यालय के फार्माकोजेनेटिक्स विभाग, जर्नल ऑफ न्यूरोएंडोक्रिनोलॉजी और ब्रिटिश सोसायटी ऑफ न्यूरोएंडोक्रिनोलॉजी द्वारा किया जा रहा है. कार्यशाला का उद्घाटन कार्यक्रम प्रभारी प्रतिकुलपति डॉ.राजेंद्र काकड़े की अध्यक्षता में किया गया. मुख्य अतिथि के रूप में ... माइकल हेस्टिंग्स,एमआरसी, आणविक जीवविज्ञान प्रयोगशाला, कैम्ब्रिज, यूके ... डॉ. रॉबर्ट गुडमैन, प्रोफेसर, फिजियोलॉजी, फार्माकोलॉजी और टॉक्सिकोलॉजी विभाग, वेस्ट वर्जीनिया यूनिवर्सिटी, यूएसए विशिष्ट अतिथि ... में ,फार्मास्युटिकल इंजीनियरिंग के ... प्रशांत पुराणिक, कार्यशाला समन्वयक ... दादासाहब कोकरे उपस्थित थे. इस ... डॉ. हेस्टिंग्स ने न्यूरोएंडोक्राइन अनुसंधान में अत्याधुनिक तकनीक का बीड़ा उठाया और आगामी अनुसंधान में अंतर को पाटने हेतु मार्गदर्शन किया. डॉ. गुडमैन ने अंतःस्रावी तंत्र के तंत्रिका जीव विज्ञान के अपने गहन ज्ञान का एक व्यापक विवरण प्रदान किया. साथ ही मेटाबोलिक रोगों पर शोध की वर्तमान स्थिति पर भी विचार व्यक्त किये गये.अध्यक्षीय भाषण देते हुए प्रभारी प्रतिकुलपति डॉ. राजेंद्र काकड़े ने छात्रों में शोध कौशल के विकास और कार्य को पूरा ...

फार्मास्युटिकल निर्माण विभाग के प्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक ने न्यूरोएंडोक्रिनोलॉजी विषय पर प्रकाश डाला और कार्यशाला के सफल आयोजन के लिए विभाग के प्रयासों की सराहना की. संयोजक डॉ. दादासाहेब कोकरे ने विभाग स्तर पर न्यूरोएंडोक्राइन अनुसंधान में प्रगति के महत्व और छात्रों और उभरते शोधकर्ताओं के लिए इसके उज्ज्वल भविष्य के लिए किए जा रहे प्रयासों के बारे में बात की.उद्घाटन कार्यक्रम में मुख्य भाषण डॉ. विनोद कुमार, किंग ... प्रभावों को समझाया.

डॉ. रीता वडेतवार ने उद्घाटन सत्र का संचालन किया जबकि डॉ. राजेश उगले ने धन्यवाद ज्ञापित किया. पूर्व विभागाध्यक्ष डॉ. प्रमोद खेडेकर, आईआईएल प्रभारी निदेशक डॉ. निशिकांत राउत, प्रौद्योगिकी एवं ऊर्जा पार्क निदेशक प्रकाश इटनकर, डॉ. प्रमोद साल्वे और डॉ. सतेन्द्र प्रसाद मुख्य रूप से उपस्थित थे. भारत भर के विभिन्न विश्वविद्यालयों और कॉलेजों के छात्रों ने भाग लिया.

## पुण्य नगरी

# मानसोपचारतज्ज्ञांची समाजविकासात महत्त्वपूर्ण भूमिका : डॉ. राजेंद्र काकडे



Nagpur Edition
Nov 14, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

## लोकसत्ता

# गृहविज्ञान विभागात मतदार जनजागृती कार्यक्रम

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर गृह विज्ञान विभागात मतदार जनजागृती कार्यक्रम मंगळवार १२ नोव्हेंबर रोजी घेण्यात आला. या कार्यक्रमाअंतर्गत घोषणा, लेखन तसेच सेल्फी काढण्याबाबत स्पर्धा घेण्यात आली.

महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २० नोव्हेंबर रोजी होऊ घातली आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार जनजागृती व्हावी म्हणून विद्यापीठाच्या पदव्युत्तर गृहविज्ञान विभागाच्या वतीने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी सेल्फी काढण्याचा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात गृह विज्ञान आणि पोषण तसेच संसाधन व्यवस्थापन या दोन्ही अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण व्हावी म्हणून घोषणा लेखन स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली. 'तुमचे मत तुमचा आवाज', 'प्रत्येक मत अमूल्य', आदी घोषणांवर लेखन स्पर्धा घेण्यात आली.

15/11/2024 | Nagpur | Page : 14

## Rashtarasant Tukadoji Maharaj Nagpur University

